# महापालिका निवडणुकीत भाजपचा डंका



## राज्यात घवघवीत यश; मुंबईत महायुतीचा ऐतिहासिक विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात झालेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षासह महायुतीने मुसंडी मारत सर्वाधिक ठिकाणी विजय संपादन केला आहे. मुंबईत महायुतीने ठाकरे बंधूंचा पराभव करीत नवा इतिहास रचला असून इतरही नवी मुंबई, पनवेल, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, नागपूर आदी महापालिकांमध्ये भाजप आणि मित्रपक्षांनी बाजी मारली आहे.


रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १८१

www.ramprahar.com

◆ शनिवार, १७ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगर परिषद-नगरपंचायतीनंतर महापालिकांची निवडणूक झाली होती. यासाठी गुरुवारी मतदान प्रक्रिया पार पडली, तर त्यानंतर शुक्रवारी (दि. १६) मतमोजणी होऊन निकाल जाहीर झाला. हाती आलेल्या कलांनुसार संपूर्ण राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपचा बोलबाला असून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे नियोजन कौशल्यही यशस्वी ठरले आहे. याशिवाय काही महापालिकांत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाइं महायुतीने एकत्रित यश मिळवले आहे.

भाजप आणि महायुतीने राज्याच्या सर्वच विभागांमध्ये दमदार कामगिरी केली आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भात काही अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी महायुतीने महाविकास आघाडीला मात दिली. त्यामुळे महापालिका निवडणुकीत विरोधक बॅकफूटवर गेल्याचे चित्र आहे. दरम्यान, मनपामध्ये विजय मिळविल्यानंतर निवडून आलेल्या उमेदवारांची मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जनमताचा रेकॉर्डब्रेक विजय कार्यकर्त्यांना समर्पित -मुख्यमंत्री



विकासाचा अजेंडा घेऊन आम्ही जनतेसमोर गेलो होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या अजेंड्याला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. वेगवेगळ्या महापालिकांमध्ये आम्हाला रेकॉर्डब्रेक जनमत मिळाले आहे. पक्षासाठी २४ तास काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा विजय समर्पित करत असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते भाजपच्या प्रदेश कार्यालयात आयोजित जल्लोष कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगल प्रभात लोढा, राधाकृष्ण विखे-पाटील, मुंबईचे अध्यक्ष अमित साटम यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वप्रथम मी महाराष्ट्राच्या जनतेचे मनापासून आभार मानतो, कारण महापालिका निवडणुकीत भाजप आणि महायुतीला मोठा विजय त्यांनी मिळवून दिला. या निवडणुकीमध्ये सगळे रेकॉर्ड तोडले गेले असून २९ पैकी २५ महानगरपालिकांमध्ये भाजप किंवा महायुतीची सत्ता आली आहे. विशेषतः मुंबई महापालिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जरी मतमोजणीला उशीर होत असला आणि काही मतमोजणी बाकी असली तरी विद्यमान ट्रेंड पाहता महायुतीला निश्चितपणे पूर्ण बहुमत मिळेल आणि मुंबई महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकेल, याबाबत कोणतीही शंका नाही. मुंबई महापालिकेत महापौर बसल्यानंतर पुन्हा एकदा जल्लोष साजरा करूया, असेही त्यांनी सांगितले.

लोकांना विकास आणि प्रामाणिकता हवी आहे. म्हणूनच लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे. आज या निकालाने आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली, की महाराष्ट्राचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच आहे. या निकालाच्या निमित्ताने मी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेही स्मरण करतो, कारण त्यांचा आशीर्वाद महायुतीच्या पाठीशी होता आणि म्हणूनच हा विजय मिळाला आहे. आमचे हिंदुत्व संकुचित नाही, असा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी मित्र पक्षांचेही आभार मानले. शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय व इतर मित्र पक्षांचे मनापासून आभार. मी एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून संवाद साधला. त्यांनी माझे व मी त्यांचे अभिनंदन केले. पुन्हा एकदा महाराष्ट्रात महायुती मजबुतीने काम करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### पनवेलमध्ये सुज्ञ जनतेचा विकासालाच कौल!

# भाजप महायुतीचा दणदणीत विजय

## महाविकास आघाडीचा पुन्हा पराभव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) महायुतीने दणदणीत विजय मिळवत पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या निवडणुकीत महायुतीने शेकाप, काँग्रेस, शिवसेना उबाठा, मनसे यांच्या महाविकास आघाडीचा पराभव केला.

मतदानापूर्वी भाजप महायुतीच्या सहा, तर एक अपक्ष जागा बिनविरोध झाली होती. त्यानंतर गुरुवारी ७१ जागांसाठी झालेल्या मतदानाचा निकाल शुक्रवारी (दि. १६) जाहीर झाला. यामध्ये ५३ जागांवर भाजप महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी होऊन महायुतीने एकूण ५९ (भाजप ५५, शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी अजित पवार पक्ष प्रत्येकी दोन) जागा जिंकल्या. त्यामुळे पुन्हा एकदा विरोधकांना पराभवाची धूळ चारून पनवेल महापालिकेवर भाजप महायुतीचा झेंडा फडकवण्यात आमदार प्रशांत ठाकूर यशस्वी ठरले आहेत.

पनवेल महापालिकेची ही निवडणूक येथील प्रभारी माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली लढविण्यात आली. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी तसेच उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली भाजप महायुतीने नियोजनबद्ध व संघटित प्रचार केला. विकासकेंद्रित धोरण, सक्षम नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची ताकद यामुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाला. पनवेलकर सुज्ञ मतदारांनी महायुतीवर दाखवलेला प्रचंड विश्वास तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी घेतलेली अथक मेहनत या यशामागील प्रमुख कारण ठरले आहे.

शेकाप महाविकास आघाडीने फक्त टीका आणि फेक नरेटिव्ह पसरवले होते, तर भाजप महायुती केलेल्या कामाचा आढावा मांडून लोकांपुढे जात होती. त्यामुळे या वेळीही सुज्ञ मतदारांनी महाविकास आघाडीवर विश्वास ठेवला नाही आणि त्याचा परिपाक म्हणून भाजप महायुतीने मोठा विजय मिळवला.

सर्व विजयी उमेदवारांचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. विजयानंतर संपूर्ण पनवेल शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भाजप महायुतीचा विजय असो, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विजय असो, एकच वादा प्रशांतदादा, आमदार महेश बालदी आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या विजयामुळे पनवेलच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



> *पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली देशाला विकासाची नवी दिशा मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाची मजबूत पायाभरणी केली तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संघटन बळकट करत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रेरणेमुळेच पनवेल महापालिकेत भाजप महायुतीला दणदणीत विजय मिळू शकला. हा विजय म्हणजे विकास, विश्वास आणि सक्षम नेतृत्वावर पनवेलकरांनी केलेले ठाम शिक्कामोर्तब आहे. नागरिकांना अपेक्षित विकास करण्याचा आम्ही संकल्प कायम केला आहे. त्यामुळे यापुढेही विकासाचा झंझावात सुरूच ठेवू.*
>
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

### भाजप महायुतीचे विजयी उमेदवार

**बिनविरोध उमेदवार :** नितीन जयराम पाटील व ममता प्रितम म्हात्रे (प्रभाग १८), दर्शना भगवान भोईर व रूचिता गुरूनाथ लोंढे (प्रभाग १९), अजय तुकाराम बहिरा व प्रियांका तेजस कांडपिळे (प्रभाग २०)

- **प्रभाग १ :** विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नितेश बाळकृष्ण फडके
- **प्रभाग ४ :** प्रवीण काळुराम पाटील, परेशा ब्रिजेश पटेल, अनिता वासुदेव पाटील, मधू पाटील
- **प्रभाग ५ :** शत्रुघ्न अंबाजी काकडे, मिनल विजय पाटील
- **प्रभाग ६ :** उषा अजित अडसुळे, नरेश गणपत ठाकूर, सोनल कीर्ती नवघरे, समीर चंद्रकांत कदम
- **प्रभाग ७ :** अमर अरुण पाटील, प्रमिला रविनाथ पाटील, मनाली अमर ठाकूर, राजेंद्रकुमार शर्मा
- **प्रभाग ८ :** बबन नामदेव मुकादम, बायजा बबन बारगजे, सायली तुकाराम सरक, रामदास वामन शेवाळे
- **प्रभाग ९ :** महादेव जोमा मधे, प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती निलेश भोईर, शशिकांत शनिवार शेळके
- **प्रभाग १० :** रवींद्र अनंत भगत, सरस्वती नरेश काथारा, मोनिका प्रकाश महानवर, विजय मनोहर खानावकर
- **प्रभाग ११ :** प्रदीप गजानन भगत, हॅप्पी सिंग
- **प्रभाग १२ :** कुसुम रवींद्र म्हात्रे, दिलीप बाळाराम पाटील
- **प्रभाग १३ :** हेमलता गोवारी, शिला भाऊ भगत, विकास नारायण घरत, रवींद्र गणपत जोशी
- **प्रभाग १५ :** एकनाथ रामदास गायकवाड, सीता सदानंद पाटील, कुसुम गणेश पाटील, दशरथ बाळू म्हात्रे
- **प्रभाग १६ :** राजेश्री महेंद्र वावेकर, कविता किशोर चौतमोल, समीर बाळशेठ ठाकूर, संतोष गुन्डाप्पा शेट्टी
- **प्रभाग १७ :** प्रकाश चंदर बिनेदार, अस्मिता जगदीश घरत, शिवानी सुनील घरत, मनोज भुजबळ
- **प्रभाग १८ :** प्रिती जॉन्सन जॉर्ज
- **प्रभाग १९ :** सुमित उल्हास झुंझारराव, चंद्रकांत (राजू) सोनी
- **प्रभाग २० :** श्वेता सुनील बहिरा

*(सविस्तर निकाल पान ३ वर..)*

## नवी मुंबईत 'कमळ' फुलले



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत भाजप नेते तथा राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी आपले वर्चस्व सिद्ध करत विजय मिळवला आहे. नवी मुंबईकरांनी त्यांच्यावर विश्वास दाखवला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत मी गणेश नाईक यांच्या पाठीशी उभा आहे, काळजी करू नका, असे पाठबळ दिले होते. त्याचप्रमाणे आमदार मंदा म्हात्रे यांचा हात धरून समेट घडवून आणला. त्यामुळे नवी मुंबईत भाजपची सत्ता येण्यास मदत झाली.

नवी मुंबईतील निवडणूक प्रमुख म्हणून माजी खासदार संजीव नाईक, तर पक्षप्रवेश करीत माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, पुतण्या वैभव नाईक याशिवाय नाईकांच्या सुनाही प्रचारासाठी पहिल्यांदाच घराबाहेर पडल्या होत्या. या सगळ्याचा परिपाक म्हणजे नवी मुंबई महापालिकेत पहिल्यांदाच 'कमळ' फुलले आहे.

नवी मुंबईत भाजपने सर्वाधिक ६५ जागी विजय मिळविला. त्या खालोखाल शिवसेना शिंदे गटाने ४२ जागी यश प्राप्त केले. याशिवाय शिवसेना उबाठा दोन, तर मनसे व अपक्ष प्रत्येकी एक असा एकूण १११ जागांचा निकाल लागला आहे.

*(सविस्तर निकाल पान २ वर..)*





उरण : सन १९८४च्या गौरवशाली व शौर्यशाली शेतकरी लढ्याचा ४२वा स्मृतीदिन शुक्रवारी महात्मा फुले सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन प्रतिष्ठान जासईच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे हुतात्मे नामदेव शंकर घरत (चिर्ले) आणि रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतूम) यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांच्यासह इतरांनी अभिवादन केले. या कार्यक्रमास चंद्रकांत घरत, सुरेश पाटील, जितेंद्र घरत, जितेंद्र म्हात्रे, सीमा घरत यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, चिर्ले येथे हुतात्मा नामदेव शंकर घरत स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भव्य कबड्डी स्पर्धा खेळवली गेली. या स्पर्धेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

# रायगड जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ इमारतीचे पाडकाम सुरू

## नवीन सुसज्ज इमारत उभारण्यात येणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

राजगड जिल्हा परिषदेची शिवतिर्थ या प्रशासकीय इमारतीचे पाडकाम सुरू करण्यात आले आहे. ४५ वर्षांपूर्वी बांधलेली ही ईमारत जीर्ण झालेली आहे . ती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. राज्यसरकारच्या उच्चाधिकार समितीने यास मंजूरी दिली असून, नवीन प्रशासकीय इमारतीसाठी ७७ कोटी ८३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



रायगड जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम १९७८ ते १९८२ या कालावधीत करण्यात आले होते. इमारतीच्या बांधकामाला ४५ वर्ष पूर्ण झाली आहेत. लोकल बोर्ड बरखास्त होऊन जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यानंतर पेण येथील जिल्हास्तरीय कार्यालये अलिबाग येथे एका छताखाली आणण्याचा प्रयत्न तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी केला होता. त्यानंतर विभागांची संख्या वाढल्याने तळ मजल्यासह दोन मजल्याची इमारत कमी पडू लागली. त्यानंतर इमारतीच्या टेरेसवर वाढीव बांधकाम करून नवी कार्यालये सुरू करण्यात आली होती.आता ही इमारत जीर्ण झाली आहे. तीन वर्षांपूर्वी या इमारतीमधील कार्यालये कुंटे बाग येथे स्थलांतरित करून इमारत रिकामी करण्यात आली. तांत्रिक अडचणीमुळे ही इमारत पडता आली नव्हती.

आता ही इमारत पडून तेथे नवीन इमारत उभारण्यात येणार आहे. नवीन इमारतीत तळ मजल्यावर पूर्णपणे पार्किंगची व्यवस्था असून त्यावर सात मजले असतील. जिल्हा परिषदेचे बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, ग्रामपंचायत ही सर्व कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत. साधारण ५५० कर्मचाऱ्यांच्या कामासाठी प्रशस्त जागा निर्माण केली जात असून अभियंत्यांसाठी स्वतंत्र कक्षाचे नियोजन आहे. इमारतीमध्ये पदाधिकारी, अधिकारी यांच्या दालनांची अंतर्गत सजावट आधुनिक शैलीत असली तरी जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट होईल, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. तर दुसरी इमारत ही पंचायत समिती कार्यालया शेजारी उभारण्यात येणार आहे.

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील स्थापत्य अभियंत्यामार्फत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. यात ही इमारत धोकादायक असल्याचा निष्कर्ष काढला होता. त्यामुळे इमारत पाडून नव्याने बांधण्यात यावी, अशी सूचनाही करण्यात आली. त्यामुळे जिल्हा परिषदेतील विविध विभागांची कार्यालये शहरातील कुंटे बाग, पोस्ट ऑफीस समोर, अलिबाग पंचायत समिती इमारत येथे हलविण्यात आली. यानंतर नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या होत्या. नवीन इमारतीच्या बांधकामासाठी निधी मिळावा यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीला मान्यता दिली आहे. ७७ कोटी ८३ लाख रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. पुण्यातील टी अँण्ड टी विक्रम इन्फ्रा जेव्ही कंपनीला या कामाचे कंत्राट मंजूर करण्यात आले आहे. आता मात्र जूनी इमारत पाडण्याला मंजूरी मिळाली आहे, इमातरीवरील चौथा मजला काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

## रायगडात डिसेंबरमध्ये मद्यविक्रीचा उच्चांक; ४३ लाख बल्क लिटर दारू रिचवली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात मद्यविक्रीने उच्चांक गाठला असून, तब्बल ४३ लाख २७ हजार ५२५ बल्क लिटर दारू तळीरामांनी रिचवली. यामध्ये बीअरची विक्री सर्वाधिक झाल्याचे राज्य उत्पादन शुल्क रायगड विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. देशी व विदेशी दारूपेक्षा बीअरला मद्यपींची पसंती मिळाल्याने वाईनच्या विक्रीत मात्र लक्षणीय घट नोंदवली गेली.



डिसेंबरमध्ये नाताळसह थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, कॉटेज पर्यटकांनी फुल्ल होते. दहा लाखांहून अधिक पर्यटकांनी या कालावधीत जिल्ह्याला भेट दिल्याने मद्यविक्रीत प्रचंड वाढ झाली. अनेक ठिकाणी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मद्यविक्रीचे परवानेही देण्यात आले.

विदेशी दारूच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने ६५० रुपयांची बाटली ९०० रुपयांपर्यंत गेली असून, प्रत्येक क्वॉर्टरमागे साठ रुपयांची वाढ झाली. त्यामुळे यंदा बीअर पिण्याकडे मद्यपींचा कल अधिक दिसून आला. त्याचा परिणाम विदेशी दारूच्या विक्रीवर झाला असल्याची माहिती समोर येत आहे.

### अशी झाली दारू विक्री

***आकडेवारीनुसार, डिसेंबर महिन्यात ४३ लाख २७ हजार ५२५ बल्क लीटर इतकी दारु मद्यपींनी रिचवल्याची माहिती समोर आली. त्यामध्ये ९ लाख ५१ हजार ३८१ बल्क लीटर देशी दारु, ९ लाख १४ हजार ४२६ बल्क लिटर विदेशी दारू, २४ लाख ९६ हजार ९६० बल्क लीटर बीअर आणि ६४ हजार ७५८ वाईन विकली गेली.***

## तळोजा मध्यवर्ती कारागृह परिसरात बिबट्याचा वावर

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा मध्यवर्ती कारागृहाचे मागील डॉगर परिसरामधून बिबट्याने कारागृहाचे वसाहत परिसरात शिरकाव केल्याचे कारागृह अधिकारी-कर्मचारी यांना आढळून आले. त्यामुळे रात्रीचेवेळी कर्तव्यावर येणारे व सुरक्षा गस्तीसाठी ये-जा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून सर्वजण बिबट्याचे दहशतीखाली कर्तव्य बजावत आहेत. कारागृह परिसरामधील अधीक्षक बंगला वगळता आजूबाजूस कोणीही निवासी नसल्याने शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असलेले अधीक्षक व त्यांचे कुटुंबिय यांचे जिवितास धोका निर्माण झालेला आहे. लवकरात लवकर या बिबट्याचा शोध घेऊन त्याला पकडणे आवश्यक झाले आहे.

तळोजा मध्यवर्ती कारागृहाची परिसरात मागील बाजूस अधीक्षक बंगला असून सद्यस्थितीत तेथे कारागृह अधीक्षक हे सहकुटुंब वास्तव्यास आहेत. अधीक्षक बंगल्याचे सुरक्षेकरीता दिवसपाळीत व रात्रपाळीत कर्मचारी नेमलेले असतात.

बिबट्यास पकडण्यासाठी लोखंडी पिंजरा लावणेकरीता व आवश्यक उपाययोजना तातडीने करणेबाबत वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल यांना कारागृह प्रशासनाने लेखी पत्रांन्वये विनंती केलेली असून त्यांनी देखील पाहणी करुन ट्रॅप कॅमेरे बसविलेले आहेत. बिबट्या जेरबंद होईपर्यंत अधिकारी व कर्मचारी जीव मुठीत घेऊन कर्तव्य बजावीत आहेत.

## शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ल्याप्रकरणी तलाठी-सर्कल संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बसस्थानक परिसरात बागमांडला सर्कलचे शासकीय कर्मचारी कमलाकर गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी अपुरी व सौम्य कलमे लावल्याचा गंभीर आरोप तलाठी-सर्कल कर्मचारी संघटनेने केला आहे. या संदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी श्रीवर्धनचे तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांची भेट घेऊन सविस्तर लेखी निवेदन सादर केले असून, योग्य व कठोर कायदेशीर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



संघटनेच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक ठिकाणी शासकीय कामकाज बजावत असताना झालेला हा हल्ला पूर्वनियोजित, भ्याड व गंभीर स्वरूपाचा असून, भारतीय दंड संहितेनुसार शासकीय कर्मचाऱ्यावर कर्तव्य बजावत असताना झालेल्या हल्ल्यासाठी कठोर कलमे लावणे अनिवार्य होते. मात्र प्रत्यक्षात लावण्यात आलेली कलमे अपुरी असल्याने आरोपींना अप्रत्यक्ष संरक्षण मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, यामुळे संपूर्ण शासकीय यंत्रणेत असुरक्षिततेची भावना पसरत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला हा केवळ वैयक्तिक स्वरूपाचा गुन्हा नसून, तो प्रशासनाच्या अधिकारावर व कायद्याच्या अंमलबजावणीवर झालेला थेट आघात आहे. अशा प्रकारच्या घटनांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात शासकीय कर्मचारी निर्भयपणे काम करू शकणार नाहीत, तसेच कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणात पोलिसांनी तत्काळ फेरतपास करून संबंधित आरोपींवर कठोर व योग्य कायदेशीर कलमे लावावीत, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत अशा घटनांवर शून्य सहनशीलतेची भूमिका घ्यावी.निवेदनात पुढे इशारा देण्यात आला आहे की,जर या प्रकरणात योग्य कारवाई करण्यात आली नाही, तर संघटनेच्या वतीने पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## खालापूर पोलिसांनी करोडो रुपयांचा गुटका पकडला

**चौक : प्रतिनिधी**

पुणेकडून मुंबईला जाताना खालापूर पोलीस ठाण्याच्या द्रुतगती महामार्गावर टोल नाक्यावर ट्रकमध्ये भरलेल्या गुटखा आणि सुपारी यांची करोडो रुपयांची गोणी खालापूर पोलिसांनी जप्त करून खालापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आली आहेत.

एका गोपनीय माहितीनुसारनुसार खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी शुक्रवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास आपल्या साथीदारांसह टोल नाका येथे सापळा रचला, हा ट्रक टोल नाक्यावर आल्यावर त्याची झडती महामार्ग पोलीस यांच्या मदतीने घेतली असता त्यात भरलेली गोणी सापडली. हा ट्रक खालापूर पोलिस ठाण्यात आणला असून शासकीय पंचनामा अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग, पुरवठा शाखा, महामार्ग पोलीस व खालापूर पोलीस यांच्या समोर सुरू करण्यात आला आहे,

अद्याप मोजमाप झाले नसले तरी करोडो रुपयांचा गुटखा असल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उप निरीक्षक कुंभार, सपोनी.नितीन सांगळे, रायटर बाळा जाधव,महामार्ग पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील,पोलिस उप निरीक्षक कुंभार,अरविंद पुस्पूलवार कृष्णा मुंढे, शुभम वाडीले, संदेश कावजी, योगेश टेमकर, दशरथ मोकल यांनी ही कारवाई केली.

## धनगर आरक्षण आंदोलनाला रायगडातून समाजाचा जाहीर पाठिंबा

**चौक : प्रतिनिधी**

धनगर समाजाला (एसटी सर्टिफिकेट) धनगर आरक्षण मिळावे यासाठी मल्हार योद्धे दिपक बोराडे यांच्या नेतृत्वाखाली २१ जानेवारी पासून आझाद मैदानावर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार आहे. याला रायगड जिल्ह्यातून पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे.

या आंदोलनाला रायगड जिल्हातून समाजाचा जाहीर पाठींबा मिळत असून हर हर चांगभले धनगर समाज संस्था रायगड यांनी त्यांना जाहीर पाठींबा दिला आहे तर २१ जानेवारीला आझाद मैदानावर मोठ्या संख्येने समाज बांधवानी संख्येने उपस्थित राहावे राहून समाजाची मोठी ताकद मल्हार योद्धे दिपक बोराडे यांच्या पाठीशी उभी करावी असे आवाहन जिल्हाध्यक्ष अँड संतोष आखाडे यांनी केले आहे

गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाजाला( एसटी सर्टिफिकेट) धनगर आरक्षण मिळावे यासाठी अनेक मोर्चे आंदोलन, रस्ता रोको आंदोलन झाले मात्र गेल्या ७० वर्षांपासून धनगर समाजाला एकाही सरकारने आरक्षण दिले नसल्याने धनगर समाजाने आक्रमक पवित्रा घेतला असून दिपकभाऊ बोराडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रातील धनगर समाजाने एकजूट होऊन आझाद मैदानावर भव्य आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनात रायगड जिल्हातून धनगर समाजाने गट तट बाजूला ठेवून धनगर समाज बांधवानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सचिव अनंता हिरवे यांनी केले आहे

या बैठकीला हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष अँड. संतोष आखाडे, सचिव अनंता हिरवे, महासचिव संपत ढेबे, कर्जत तालूका अध्यक्ष रामदास कोकरे, खालापूर तालूका अध्यक्ष हरेश ढेबे, सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे, माजी उपसरपंच विजय ढेबे, खालापूर तालूका सचिव चंद्रकांत हिरवे,खजिनदार दत्ता गोरे, बाबु मरगळे, जानु बर्गे, बबन हिरवे आदिसह अनेक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल



**नवी मुंबई : बातमीदार**

**नवी मुंबई महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जोरदार मुसंडी मारली आहे. एकूण १११ जागांपैकी भाजप ६५, शिवसेना (शिंदे) ४२, शिवसेना (ठाकरे) दोन, तर मनसे व अपक्ष यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली. यामध्ये भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. महापालिका निवडणूक गुरुवारी झाली होती. या निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी (दि.१६) होऊन निकाल जाहीर करण्यात आला. विजयी उमेदवारांचे अभिनंदन होत आहे.**

**प्रभाग क्र. १**
अ = अरुणा शंकर शिंदे, शिवसेना (शिंदे)
ब = चांदनी चौगुले, शिवसेना (शिंदे)
क = जगदीश गवते, शिवसेना (शिंदे)
ड = रामआशिष यादव, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. २**
अ= श्वेता काळे, शिवसेना (शिंदे)
ब = विजय चौगुले, शिवसेना (शिंदे)
क = गौरी आंग्रे, शिवसेना (शिंदे)
ड = शुभम चौगुले, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. ३**
अ = राजू कांबळे, शिवसेना (शिंदे)
ब = वैशाली पाटील, शिवसेना (शिंदे)
क = पूजा पाटील, शिवसेना (शिंदे)
ड = आकाश मढवी, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. ४**
अ = ऐश्वर्या सोनावणे, शिवसेना (शिंदे)
ब = मनोज हळदणकर, शिवसेना (शिंदे)
क = हेमांगी सोनावणे, शिवसेना (शिंदे)
ड = शिवाजी खोपडे, भाजप

**प्रभाग क्र. ५**
अ = रेश्मा मढवी, भाजप
ब = ममित चौगुले, शिवसेना (शिंदे)
क = श्रेया जिरगे, भाजप
ड = अशोक पाटील, भाजप

**प्रभाग क्र. ६**
अ = रंजना सोनवणे, भाजप
ब = वर्षा डोळे, भाजप
क = गंगा पाटील, भाजप
ड = सुधाकर सोनवणे, भाजप

**प्रभाग क्र. ७**
अ = अनिता मानवतकर, शिवसेना (शिंदे)
ब = मंदाकिनी म्हात्रे, शिवसेना (शिंदे)
क= चैताली पाटील, शिवसेना (शिंदे)
ड = अनिकेत म्हात्रे, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. ८**
अ = गणेश सपकाळ, भाजप
ब = हरिजन माधुरी देव, भाजप
क = ललिता मढवी, भाजप
ड = अंजना म्हात्रे, भाजप

**प्रभाग क्र. ९**
अ = प्रशांत पाटील, शिवसेना (शिंदे)
ब = दीपाली संकपाळ, शिवसेना (शिंदे)
क = वैशाली मस्कर, शिवसेना (शिंदे)
ड = सौरभ शिंदे, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. १०**
अ = संदीप म्हात्रे, भाजप
ब = सायली शिंदे, भाजप
क = चंद्रभागा मोरे, भाजप
ड = राजू मढवी, भाजप

**प्रभाग क्र. ११**
अ = मीनाक्षी पाटील, भाजप
ब = अनिता पाटील, शिवसेना (शिंदे)
क = शिरीष पाटील, भाजप
ड = शिवराम पाटील, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. १२**
अ = रविकांत पाटील, भाजप
ब = भारती पाटील, भाजप
क = दीक्षा कचरे, शिवसेना (शिंदे)
ड = ज्ञानदेव पाटील, भाजप

**प्रभाग क्र. १३**
अ = सागर नाईक, भाजप
ब = अदिती नाईक, भाजप
क = वैष्णवी नाईक, भाजप
ड = मुनावर पटेल, भाजप

**प्रभाग क्र. १४**
अ = प्रतिक्षा जयेश पाटील, भाजप
ब = सविता सांगोळे, शिवसेना (शिंदे)
क = शशिकांत भोईर, भाजप
ड = भोईर भरत कृष्णा, अपक्ष

**प्रभाग क्र. १५**
अ = शुभांगी पाटील, भाजप
ब = शशिकला पाटील, भाजप
क = कविता पाटील, शिवसेना (शिंदे)
ड = रामचंद्र घरत, भाजप

**प्रभाग क्र. १६**
अ = शशिकांत राऊत, भाजप
ब = अंजनी भोईर, भाजप
क = अंजली वाळुंज, भाजप
ड = प्रकाश मोरे, भाजप

**प्रभाग क्र. १७**
अ = किशोर पाटकर, शिवसेना (शिंदे)
ब = प्रणाली अविनाश लाड, शिवसेना (शिंदे)
क = सोनवी अविनाश लाड, शिवसेना (शिंदे)
ड = दिव्या गायकवाड, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. १८**
अ = प्रीती भगत, भाजप
ब = दयावती संपत शेवाळे, भाजप
क = दशरथ भगत, भाजप
ड = निशांत भगत, भाजप

**प्रभाग क्र. १९**
अ = गणपत (भाऊ) भापकर, भाजप
ब = शैला पाटील, भाजप
क = शिल्पा ठाकूर, भाजप
ड = सुनील कुरकुटे, भाजप

**प्रभाग क्र. २०**
अ = सविता लगाडे, शिवसेना (शिंदे)
ब = अबोली कुलकर्णी, शिवसेना (शिंदे)
क = सुरेश कुलकर्णी, शिवसेना (शिंदे)
ड = चंद्रकांत आगोंडे, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. २१**
अ = माधुरी सुतार, भाजप
ब = मीरा पाटील, भाजप
क = जयवंत सुतार, भाजप
ड = सुरेश शेट्टी, भाजप

**प्रभाग क्र. २२**
अ = विशाल ससाणे, शिवसेना (ठाकरे)
ब = प्रणाली पाटील, भाजप
क = शशिकला औटी, शिवसेना (शिंदे)
ड = अभिजित देसाई, मनसे

**प्रभाग क्र. २३**
अ = सुजाता पाटील, भाजप
ब = रूपाली भगत, भाजप
क = प्रदीप गवस, भाजप
ड = सुरज पाटील, भाजप

**प्रभाग क्र. २४**
अ = गिरीश म्हात्रे, भाजप
ब = प्रीती भोपी, भाजप
क = स्वप्ना गावडे, भाजप
ड = सचिन लवटे, भाजप

**प्रभाग क्र. २५**
अ = सुनील पाटील, भाजप
ब = सलुजा सुतार, भाजप
क = नेत्रा शिर्के, भाजप
ड = रवींद्र इथापे, भाजप

**प्रभाग क्र. २६**
अ = दीपक पवार, भाजप
ब = संतोषी म्हात्रे, भाजप
क = रेखा म्हात्रे, भाजप
ड = विशाल विचारे, शिवसेना (ठाकरे)

**प्रभाग क्र. २७**
अ = भारती कोळी, शिवसेना (शिंदे)
ब = पूनम पाटील, शिवसेना (शिंदे)
क = सरोज पाटील, शिवसेना (शिंदे)
ड = अमित पाटील, शिवसेना (शिंदे)

**प्रभाग क्र. २८**
अ = सुरेशा नरबागे, भाजप
ब = स्वाती गुरखे, भाजप
क = जयाजी नाथ, भाजप

**दुखवटा**

### महेश शेलार

**माणगाव :** तालुक्यातील खर्डी खुर्द गावचे रहिवाशी पत्रकार तथा डीटीपी ऑपरेटर महेश केशव शेलार यांचे शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १० वा. त्यांच्या राहते घरी खर्डी खुर्द गावी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ४२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई,दोन भाऊ,वाहिनी,दोन बहीणी,पुतणे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर खर्डी खुर्द येथील स्मशानभूमीत सायंकाळी ५ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.२५ जानेवारी रोजी तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि.२७ जानेवारी २०२६ रोजी राहते घरी खर्डी खुर्द येथे होणार असल्याचे त्यांचे बंधू मंगेश शेलार यांनी सांगितले.



# पनवेल महानगरपालिकेचा निवडणूक निकाल

| प्रभाग / जागा क्रमांक | विजयी उमेदवाराचे नाव | मिळालेली वैध मते | पक्ष | दुसऱ्या क्रमांकाची मते मिळालेल्या उमेदवाराचे नाव | मिळालेली वैध मते | पक्ष | विजयी मताधिक्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 001 - अ | पाटील विजयश्री संतोष | 6701 | भारतीय जनता पार्टी | पाटील प्रमिला निलेश | 5988 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 713 |
| 001 - ब | म्हात्रे लिना नंदकुमार | 8972 | भारतीय जनता पार्टी | अश्विनी दर्शन पाटील | 8014 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 958 |
| 001 - क | पाटील नितेश बाळकृष्ण | 8872 | भारतीय जनता पार्टी | पाटील ज्ञानेश्वर सुरेश | 6562 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 2310 |
| 001 - ड | पाटील जनार्दन पांडूरंग | 9513 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | भोईर संतोष बाबुराव | 7461 | भारतीय जनता पार्टी | 2052 |
| 002 - अ | भोईर अर्चना योगेश | 9090 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | काजल महेश पाटील | 6747 | भारतीय जनता पार्टी | 2343 |
| 002 - ब | फडके योगिता समीर | 9471 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | दाभणे अरुणा किरण | 6154 | भारतीय जनता पार्टी | 3317 |
| 002 - क | अरविंद पुंडलिक म्हात्रे | 8230 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | दिनेश रविंद्र खानावकर | 7178 | भारतीय जनता पार्टी | 1052 |
| 002 - ड | राम महादू पाटील | 9425 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | कृष्णा सिताराम पाटील | 6050 | भारतीय जनता पार्टी | 3375 |
| 003 - अ | कातकरी लिला रतन | 16014 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | कातकरी मंजुला गजानन | 10893 | शिवसेना | 5121 |
| 003 - ब | पाटील प्रगती कैलास | 12846 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ठाकूर प्रिती फुलाजी | 11808 | भारतीय जनता पार्टी | 1038 |
| 003 - क | पाटील तुषार परशुराम | 13512 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | केणी निर्दोष गोविंद | 12452 | भारतीय जनता पार्टी | 1060 |
| 003 - ड | केणी हरेश मनोहर | 13055 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | घरत विनोद कृष्णा | 11982 | भारतीय जनता पार्टी | 1073 |
| 004 - अ | श्री. प्रविण काळुराम पाटील | 11008 | भारतीय जनता पार्टी | श्री. जगदिश राजाराम घरत | 3995 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 7013 |
| 004 - ब | श्रीम. परेशा ब्रिजेश पटेल | 11169 | भारतीय जनता पार्टी | श्रीम. पाटील रिना राजेंद्र | 2484 | अपक्ष | 8685 |
| 004 - क | श्रीम. पाटील अनिता वासुदेव | 10456 | भारतीय जनता पार्टी | श्रीम. पाटील नेत्रा किरण | 4348 | अपक्ष | 6108 |
| 004 - ड | श्री. मधु पाटील | 9174 | भारतीय जनता पार्टी | श्री. गुरूनाथ लिलाधर पाटील | 3926 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 5248 |
| 005 - अ | श्री. शत्रुघ्न अंबाजी काकडे | 7982 | भारतीय जनता पार्टी | श्री. सोमनाथ श्रीपत म्हात्रे | 6569 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1413 |
| 005 - ब | श्रीम. लिना अर्जुन गरड | 7416 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | श्रीम. उपाध्याय हर्षदा अमर | 6975 | भारतीय जनता पार्टी | 441 |
| 005 - क | श्रीम. पाटील मिनल विजय | 8117 | भारतीय जनता पार्टी | श्रीम. अनिता बाबासाहेब भोसले | 6447 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1670 |
| 005 - ड | श्री. उत्तम शिवराम मोर्बेकर | 7314 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | श्री. बेरा प्रविण | 6557 | शिवसेना | 757 |
| 006 - अ | श्रीम. उषा अजित अडसुळे | 9469 | भारतीय जनता पार्टी | श्रीम. कोमल मधुकर देहाडे | 7787 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1682 |
| 006 - ब | ॲड. नरेश गणपत ठाकुर | 9875 | भारतीय जनता पार्टी | श्री. नंदु कचरू वारुंगसे | 7632 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 2243 |
| 006 - क | श्रीम. सोनल किर्ती नवघरे | 9365 | भारतीय जनता पार्टी | श्रीम. मंजुळा संतोष तांबोळी | 6137 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3228 |
| 006 - ड | श्री. कदम समीर श्रीकांत | 8301 | भारतीय जनता पार्टी | ॲड. बालेश भोजने | 7413 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 888 |
| 007 - अ | अमर अरूण पाटील | 9575 | भारतीय जनता पार्टी | सुदाम गोकुळ पाटील | 7086 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 2489 |
| 007 - ब | पाटील प्रमिला रविनाथ | 9487 | भारतीय जनता पार्टी | गायकवाड विद्या मंगल | 6784 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 2703 |
| 007 - क | मनाली अमर ठाकूर | 9317 | भारतीय जनता पार्टी | ॲड. वीणा आत्माराम पाटील | 6843 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 2474 |
| 007 - ड | राजेंद्रकुमार दिपचंद शर्मा | 8224 | भारतीय जनता पार्टी | प्रदीप केसरीनाथ ठाकूर | 6953 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 1271 |
| 008 - अ | बबन नामदेव मुकादाम | 6828 | भारतीय जनता पार्टी | सतिश मोहन पाटील | 5001 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार | 1827 |
| 008 - ब | सायली तुकाराम सरक | 7791 | शिवसेना | मयुरी प्रशांत जाधव | 3916 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार | 3875 |
| 008 - क | बारगजे बायजा बबन | 6630 | भारतीय जनता पार्टी | रश्मी राजेश कदम | 4639 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार | 1991 |
| 008 - ड | रामदास वामन शेवाळे | 5443 | शिवसेना | रोहन आत्माराम पाटील | 3215 | अपक्ष | 2228 |
| 009 - अ | मधे महादेव जोमा | 6210 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | पिंगळा मालती राजेश | 4257 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 1953 |
| 009 - ब | ॲड. प्रतिभा सुभाष भोईर | 7764 | भारतीय जनता पार्टी | पेटकर भारती विश्वास | 3843 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3921 |
| 009 - क | दमयंती निलेश भोईर | 7728 | भारतीय जनता पार्टी | निलिमा संदीप पाटील | 3633 | आम आदमी पार्टी | 4095 |
| 009 - ड | शेळके शशिकांत शनिवार | 6741 | भारतीय जनता पार्टी | प्रकाश पंढरीनाथ म्हात्रे | 4838 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 1903 |
| 010 - अ | भगत रवींद्र अनंता | 8453 | भारतीय जनता पार्टी | गोपाळ रामा भगत | 4658 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3795 |
| 010 - ब | सरस्वती नरेश काथारा | 6055 | भारतीय जनता पार्टी | काजल आनंद माने (सरकार) | 3359 | राष्ट्रीय समाज पक्ष | 2696 |
| 010 - क | महानवर मोनिका प्रकाश | 8592 | भारतीय जनता पार्टी | शीतल अंकुश माळवे | 3027 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 5565 |
| 010 - ड | विजय मनोहर खानावकर | 9914 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | संतोष (नाना) तानाजी जाधव | 2805 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 7109 |
| 011 - अ | मेघना संदीप घाडगे | 7246 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | मोहिते निलम मयूर | 6798 | भारतीय जनता पार्टी | 448 |
| 011 - ब | भगत प्रदिप गजानन | 8116 | भारतीय जनता पार्टी | रोहन(कुमार) शंकर म्हात्रे | 5792 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 2324 |
| 011 - क | हॅप्पी सिंग | 6888 | भारतीय जनता पार्टी | ॲड. समाधान आबासाहेब काशीद | 5466 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1422 |
| 012 - अ | सौ. रितिक्षा विनयकुमार गोवारी | 8199 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | कांबळे प्रभाकर शाबा | 7990 | भारतीय जनता पार्टी | 209 |
| 012 - ब | सौ. प्रिया सुनिल गोवारी | 9939 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | विदयाताई प्रकाश तामखडे | 8077 | भारतीय जनता पार्टी | 1862 |
| 012 - क | म्हात्रे कुसुम रविंद्र | 9944 | भारतीय जनता पार्टी | सौ. रिचा गौरव पोरवाल | 6761 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3183 |
| 012 - ड | पाटील दिलीप बाळाराम | 8477 | भारतीय जनता पार्टी | रामदास बुधाजी गोवारी | 7476 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1001 |
| 013 - अ | गोवारी हेमलता रवी | 8148 | भारतीय जनता पार्टी | मधुमती सचिन त्रिमुखे | 5400 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 2748 |
| 013 - ब | भगत शीला भाऊ | 7671 | भारतीय जनता पार्टी | जयश्री विवेक सुद्रिक झा | 4545 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 3126 |
| 013 - क | घरत विकास नारायण | 9419 | भारतीय जनता पार्टी | कुणाल सुनिल भेंडे | 3692 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 5727 |
| 013 - ड | रविंद्र गणपत जोशी | 8684 | भारतीय जनता पार्टी | सतीश बाबुराव चिकणे | 2637 | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | 6047 |
| 014 - अ | श्री.भगत केतन राम | 8963 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | श्री.पाटील सतिश दत्तात्रेय | 8541 | भारतीय जनता पार्टी | 422 |
| 014 - ब | श्रीम.मनिषा अनंता म्हात्रे | 9356 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | श्रीम.नेटकर रेणुका मयुरेश | 8158 | भारतीय जनता पार्टी | 1198 |
| 014 - क | कु.आर्या प्रविण जाधव | 8882 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | श्रीम.भगत सारीका अतुल | 8604 | भारतीय जनता पार्टी | 278 |
| 014 - ड | श्री.लतिफ रऊफ शेख | 8934 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | श्री.काजी इकबाल म.हुसेन | 7680 | भारतीय जनता पार्टी | 1254 |
| 015 - अ | श्री.गायकवाड एकनाथ रामदास | 7021 | भारतीय जनता पार्टी | श्री.महादेव कुंडलिक वाघमारे | 4102 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 2919 |
| 015 - ब | श्रीम.पाटील सिताबाई सदानंद | 6780 | भारतीय जनता पार्टी | कु.श्रुती अप्पासाहेब बंडगर | 4717 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 2063 |
| 015 - क | श्रीम.पाटील कुसुम गणेश | 6138 | भारतीय जनता पार्टी | श्रीम.जाधव पुजा संतोष | 4967 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 1171 |
| 015 - ड | श्री.दशरथ बाळू म्हात्रे | 5582 | भारतीय जनता पार्टी | श्री.दांगट शिवाजी मारुती | 3054 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 2528 |
| 016 - अ | श्रीम.वावेकर राजश्री महेंद्र | 6811 | भारतीय जनता पार्टी | श्रीम.करिना राजेश घरत | 3519 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3292 |
| 016 - ब | श्रीम.चौतमोल कविता किशोर | 6309 | भारतीय जनता पार्टी | श्रीम.शशिकला दशरथ सिंग | 3217 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 3092 |
| 016 - क | श्री.ठाकुर समीर बाळाराम | 6710 | भारतीय जनता पार्टी | श्री.यतिन विनायक देशमुख | 3430 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 3280 |
| 016 - ड | श्री.शेट्टी संतोष गुंडप्पा | 6506 | भारतीय जनता पार्टी | श्री.विश्वकर्मा बबनकुमार जगनारायण | 3093 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3413 |
| 017 - अ | बिनेदार प्रकाश चंदर | 8873 | भारतीय जनता पार्टी | ननावरे संजय बबनराव | 3129 | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार | 5744 |
| 017 - ब | घरत अस्मिता जगदीश | 9894 | भारतीय जनता पार्टी | गुणाबाई भगवान म्हात्रे | 3835 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 6059 |
| 017 - क | शिवानी सुनिल घरत | 9609 | भारतीय जनता पार्टी | सुप्रिया रोहन सुर्वे | 3973 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 5636 |
| 017 - ड | ॲड. मनोज भुजबळ | 10043 | भारतीय जनता पार्टी | शिरीष रत्नाकर सोनार | 3406 | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | 6637 |
| 018 - अ | **ममता प्रितम म्हात्रे** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 018 - ब | **नितीन जयराम पाटील** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 018 - क | **स्नेहल स्वप्नील ढमाले** | | अपक्ष | **(बिनविरोध)** | | | |
| 018 - ड | जॉर्ज प्रीती जॉन्सन | 5269 | भारतीय जनता पार्टी | कदम दिलीप शंकरराव | 4346 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 923 |
| 019 - अ | **दर्शना भगवान भोईर** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 019 - ब | **रुचिता गुरुनाथ लोंढे** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 019 - क | सुमित उल्हास झुंजारराव | 9572 | भारतीय जनता पार्टी | प्रशांत सुरेश नरसाळे | 4654 | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | 4918 |
| 019 - ड | चंद्रकात (राजू) सोनी | 10657 | भारतीय जनता पार्टी | ॲड. राहुल मनोहर कासारे | 3562 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 7095 |
| 020 - अ | **अजय तुकाराम बहिरा** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 020 - ब | **प्रियंका तेजस कांडपिळे** | | भारतीय जनता पार्टी | **(बिनविरोध)** | | | |
| 020 - क | बहिरा श्वेता सुनिल | 6732 | भारतीय जनता पार्टी | परदेशी पुजा प्रदिप | 3438 | भारतीय शेतकरी कामगार पक्ष | 3294 |

# पनवेल, उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये मनाई आदेश जारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मा.राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजीचे अधिसुचनेनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक सन-२०२६ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये १६ जानेवारी २०२६ रोजी पासून २१ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत निवडणुक कार्यक्रमांनुसार उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे. तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दि.२७ जानेवारी २०२६ आहे.

याअनुषंगाने, विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे.

त्याकरिता पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मि नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये तहसिलदार कार्यालय, जुना ठाणा नाका रोड, साईनगर, पनवेल, जि. रायगड व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्त सिडको प्रशिक्षण केंद्र, सेक्टर नं. ३०, बोकडविरा, उरण, जि.रायगड यांच्या कार्यालयाचे १०० मीटर परिक्षेत्रात पुढीलप्रमाणे बंदी आदेश जारी केला आहे.

नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना उमेदवारांना फक्त दोन वाहने घेवून जाता येतील. कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास, कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे. ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे. कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर चिटकवण्यास मनाई करण्यात येत आहे. उमेदवार नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात उमेदवारांसोबत दोन व्यक्ती यांच्या व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीस जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश १३ जानेवारी २०२६ रोजी ००.०१ वा. पासून ते २७ जानेवारी २०२६ रोजीचे २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सीकेटी महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन शैक्षणिक महोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून (अमृत महोत्सवी वर्षानिमित्त) चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) यांच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने दोन दिवसीय बायोटोपिया २०२६ : आंतर महाविद्यालयीन शैक्षणिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचा उद्देशविद्यार्थ्यांना विविध संवादात्मक आणि मनोरंजक स्पर्धांच्या माध्यमातून त्यांची वैज्ञानिक क्षमता, सर्जनशीलता, सांघिक भावना आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी केवळ संकल्पनाच शिकल्या नाहीत, तर शैक्षणिक मनोरंजक कार्यक्रमांसोबतच आकर्षक रोख पारितोषिकेही जिंकली.

उद्‌घाटन समारंभ प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी.अघाव, विज्ञान विभागाच्या प्रभारी डॉ. जे. एस. ठाकूर, आणि जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख व दोन दिवसीय 'बायोटोपिया' कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. सीमा कोकितकर यांच्या हस्ते विभागीय सभागृहात पार पडला. या वेळी पिल्लई कॉलेज, पनवेल येथील बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या विभागप्रमुख आणि सहाय्यक प्राध्यापक सुपर्णा दीपक या 'बायोटोपिया' कार्यक्रमासाठी बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात मुंबई आणि नवी मुंबई विभागातील १० वेगवेगळ्या महाविद्यालयांतील २०० हून अधिक पदवी आणि पदव्युत्तर विज्ञान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. शर्मिला घंगाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

'बायोरंगोळी' हे एक प्रमुख आकर्षण होते, जिथे सहभागींनी पेशींची रचना, डीएनए हेलिक्स, सूक्ष्मजीव, वनस्पती घटक आणि पर्यावरणीय प्रणालींपासून प्रेरित होऊन दृश्यात्मक दृष्ट्या अप्रतिम रांगोळीच्या नक्षीकाम तयार केले. या उपक्रमाने कला आणि विज्ञानाचा सुंदर मिलाफ साधला, ज्यामुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि संकल्पनात्मक समज दिसून आली.

बहुप्रतिक्षित 'बायोक्विझ' अनेक फेऱ्यांमध्ये आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आण्विक जीवशास्त्र, अनुवंशशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैव रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञानाचे उपयोजन आणि अलीकडील वैज्ञानिक घडामोडींमधील ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. रॅपिड-फायर आणि बझर फेऱ्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले, ज्यामुळे हे महोत्सवातील सर्वात उत्साही सत्रांपैकी एक ठरले. विद्यार्थ्यांनी 'बायोशेराज'मध्ये सक्रिय सहभाग घेऊन वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्षात सादर केल्या.

ज्यांना बौद्धिक आव्हाने आवडतात, त्यांच्यासाठी 'बायोरिडल'ने एक मजेदार आणि उत्सुकतापूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले, जिथे विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र-आधारित कोडी आणि प्रश्न सोडवले. या उपक्रमाने कल्पक विचारसरणीला प्रोत्साहन दिले आणि वैज्ञानिक संकल्पनांना आकर्षक व सुलभ बनवले.

साहसी 'ट्रेझर हंट' ने संपूर्ण कॅम्पसमध्ये उत्साहाची लाट आणली. सहभागींनी वैज्ञानिक तथ्ये, प्रयोगशाळेतील सूचना आणि पर्यावरणीय संकेतांचा वापर करून अंतिम ठिकाणापर्यंत पोहचले. या कार्यक्रमाने सांघिक कार्य, रणनीती आणि निरीक्षण कौशल्यांना प्रोत्साहन दिले.

वैज्ञानिक सर्जनशीलतेला आधुनिकतेची जोड देत, 'क्लिकोफिलिक'ने जैविक छायाचित्रणावर लक्ष केंद्रित केले. विद्यार्थ्यांनी सूक्ष्म, पर्यावरणीय आणि प्रायोगिक प्रतिमा टिपल्या, ज्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे सौंदर्य अधोरेखित केले.

जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख व दोन दिवसीय 'बायोटोपिया' कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. सीमा कोकितकर यांच्यासह बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या सर्व प्रध्यापक वृंद, सुशीलकुमार घाडगे, लतिका चव्हाण, डॉ. शर्मिला घंगाळे, डॉ. रुपाली नानेकर, भावना सूर्यवंशी, डॉ. अनुप्रिता वाठारकर, माधुरी वैशंपायन, दिप्ती पाटील आणि वैष्णवी वेताळ यांनी विशेष मेहनत घेतली.

महोत्सवाची सांगता पारितोषिक वितरण समारंभाने झाली, या वेळी विजेत्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल रोख पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. अनुप्रिता वाठारकर यांनी आभार प्रदर्शन केले.

# राष्ट्र सेविका समितीतर्फे उद्या पनवेल येथे सघोष पथसंचलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समरस, सुखमय व सुसंघटित समाजनिर्मितीसाठी 'राष्ट्र सर्वोपरी' हे बीज प्रत्येक कुटुंबात रुजणे आवश्यक आहे. यासाठी सक्षम मातृशक्तीचे संघटन करण्याचे कार्य गेली नऊ दशके राष्ट्र सेविका समिती सातत्याने करत आहे. या कार्याचेच प्रत्यक्ष दर्शन घडवणारा उपक्रम म्हणजे सघोष पथसंचलन असून राष्ट्र सेविका समिती रायगड जिल्हा यांच्या वतीने रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी पनवेल शहरात सघोष पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

संचलनाची सुरुवात सायंकाळी ४.३० वाजता गुजराती शाळा, पनवेल येथून होणार आहे.हे पथसंचलन गुजराती शाळा येथून निघून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे डावीकडे वळून विसावा हॉटेल, ज्योती आहार भवन, कायस्थ हॉल, विरुपाक्ष मंदिर येथून पुढे जात कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा येथे वळेल. त्यानंतर क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृह, शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा गुजराती शाळा येथे संचलनाची सांगता होईल.

या सघोष पथसंचलनाच्या स्वागतासाठी तसेच ध्वजावर पुष्पवृष्टी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्र सेविका समिती, रायगड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# महाविजय!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा अजेंडा घेऊनच भारतीय जनता पक्ष राज्यातील महापालिकांच्या निवडणुकांमध्ये जनतेसमोर गेला होता आणि विकासाच्या या अजेंड्याला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. राज्यातील २९ महापालिकांपैकी अवघ्या तीन-चार महापालिका वगळता पनवेलसह जवळपास सर्व महापालिकांमध्ये भाजप आणि महायुतीला मोठे यश मिळाले आहे. देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेचाही यात समावेश आहे.

**राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले आणि ऐतिहासिक म्हणाव्यात अशा या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष आणि महायुतीलाच महाविजय मिळाला आहे. अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेचे निकाल येण्यास थोडा अधिक वेळ लागला, पण समोर आलेले कल व तिथे निकालांची जी वाटचाल उशीरापर्यंत सुरू होती त्यावरून मुंबईतही महायुतीलाच बहुमत मिळणार हे दिवसाअखेरीस पुरेसे स्पष्ट झाले. पनवेल महापालिकेतही भाजप व महायुतीने दणदणीत विजय मिळवत पुन्हा एकदा सत्ता प्रस्थापित केली आहे. राज्यातील २९ महापालिकांपैकी लातूर, चंद्रपूर व वसई-विरार अशा तीन-चार महापालिका वगळता उर्वरित जवळपास सर्व महापालिकांमध्ये भाजप आणि महायुतीला विक्रमी यश मिळाल्याचे शुक्रवारी समोर आलेल्या कल व निकालांवरून दिसत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा अजेंडा घेऊनच भाजप या निवडणुकांमध्ये जनतेसमोर गेला होता आणि विकासाच्या या अजेंड्याला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. लोकांना विकास हवा आहे, लोकांना प्रामाणिकपणा हवा आहे हे या निवडणुकांनी सिद्ध केले आहे असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निकालानंतर बोलताना काढले. निवडणूक प्रभारी माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली लढविण्यात आलेल्या पनवेल महापालिका निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांनी शेकाप महाविकास आघाडीचा सपशेल पराभव केला. मतदानापूर्वी येथे भाजप महायुतीच्या सहा तर एक अपक्ष जागा बिनविरोध झाली होती. त्यानंतर ७१ जागांसाठी झालेल्या मतदानात ५३ जागांवर भाजप महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी होऊन भाजप महायुतीने एकूण ५९ जागा जिंकल्या. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी तसेच जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली भाजप महायुतीने नियोजनबद्ध व संघटित प्रचार केला. विकासकेंद्रित धोरण, सक्षम नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची ताकद यामुळे पनवेल महापालिकेत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुतीला हे घवघवीत यश मिळाले आहे. एकंदरच महाराष्ट्राचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच आहे हे या महापालिका निवडणुकांच्या निकालांनी सिद्ध केले आहे. या प्रत्येक शहरातील गरीब आणि मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यास आम्ही समर्पित आहोत. या मोठ्या जनसमर्थनासोबतच येणाऱ्या मोठ्या जबाबदारीची जाणीव सर्व कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. जिंकल्यानंतर उन्मादाने वागायचे नाही हेही कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. जनतेने आपल्याला पारदर्शी कारभाराच्या अपेक्षेने निवडून दिले आहे याची जाणीव लोकप्रतिनिधींनी ठेवली पाहिजे. जनतेचा भारतीय जनता पक्षावर विश्वास आहे. कुठेही या विश्वासाला तडा जाणार नाही असेच वर्तन कार्यकर्ते, नेते व निवडून आलेले नगरसेवक करतील असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मित्रपक्षांचे आभार मानून महाराष्ट्रात महायुती मजबुतीने काम करील अशी ग्वाहीही फडणवीस यांनी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली देशाला विकासाची नवी दिशा मिळाली आहे.**

# शहिदी समागम : सेवा, समानता, मानवतेचा महासंगम




भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे ते 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर संपन्न होणार असून देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.

**नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग**

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. 'सर्व धर्म समान, सर्व मानव समान' हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.

**मुख्य मंडप, अनवाणी चालण्याची परंपरा आणि श्रद्धेचा सन्मान**

कार्यक्रमस्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोन्ही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहे. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रमस्थळी अनवाणी चालणार आहेत.

ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे. तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जन्मगाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहे.

**श्रमदानातून उभी राहणारी सेवा संस्कृती**

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत कार्यक्रमस्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली.

प्रशासन, विद्यार्थी, स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूंच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

**लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर**

या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३,००० भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहेत.

लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या 'सर्व मानव समान आहेत' या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.

**विनामूल्य सेवा स्टॉल**

कार्यक्रमस्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूंच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

**जुताघर : नम्रतेचा आणि अहंकार त्यागाचा संस्कार**

कार्यक्रमस्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जुताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे. जुताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.

**गतका, परंपरा आणि शौर्याचे दर्शन**

या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूंच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहचवण्यात येणार आहे.

या समागमासाठी दिल्ली अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैदराबाद येथून मोफत रेल्वे सेवा राहणार असून तसेच विशेष विमानसेवा दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत

**हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी : श्रद्धेचा अभिषेक**

या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गुरूंच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.

**सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होऊ या**

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य, महंत आदी उपस्थित राहणार आहेत.

चला तर मग, या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनू या,सेवेत सहभागी होऊ या आणि गुरूंच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

**-अलका पाटील**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

## बदलते तंत्रज्ञान

# वाहने धडकण्यापूर्वी एकमेकांना अलर्ट देतील

आता गाड्या एकमेकांना धडकण्यापूर्वी स्वतःच एकमेकांना अलर्ट करू शकतील. यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी घोषणा केली आहे की, सरकार २०२६ च्या अखेरपर्यंत देशात 'व्हीकल-टू-व्हीकल' (V2V) कम्युनिकेशन तंत्रज्ञान अनिवार्य करण्याची योजना आखत आहे.



या तंत्रज्ञानाच्या मदतीने गाड्या रस्त्यावर धावताना एकमेकांना सुरक्षिततेचे अलर्ट पाठवू शकतील, ज्यामुळे धडक आणि अपघात टाळता येतील. हा निर्णय २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यांच्या बैठकीनंतर घेण्यात आला आहे. सरकारचे उद्दिष्ट २०३०पर्यंत रस्ते अपघातांमध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या ५०%पर्यंत कमी करणे आहे.

तंत्रज्ञान कसे काम करेल: पायलटप्रमाणे बोलतील ड्रायव्हर्स नितीन गडकरींनी ही प्रणाली समजावून सांगितली की, ती लागू झाल्यानंतर गाड्या एकमेकांशी तशाच संवाद साधू शकतील जसे आकाशात पायलट करतात. प्रत्येक गाडीत एक 'ऑन-बोर्ड युनिट' (OBU) बसवले जाईल. हे युनिट आजूबाजूच्या इतर गाड्यांना त्यांची लोकेशन, वेग, दिशा आणि ब्रेक लावण्यासारखी माहिती वायरलेस तंत्रज्ञानाद्वारे पाठवेल. यामुळे चालकाला धोका दिसण्यापूर्वीच अलर्ट मिळेल.

**धुक्यात आणि अंध वळणावरही अलर्ट मिळेल**


V2V तंत्रज्ञान अशा परिस्थितीत सर्वाधिक प्रभावी ठरेल जिथे कॅमेरा किंवा रडार काम करू शकत नाहीत.

धुके आणि धूर: दृश्यमानता कमी असली तरी, मागच्या गाडीला कळेल की पुढच्या गाडीने अचानक ब्रेक लावले आहेत.

ब्लाइंड स्पॉट : अंध वळण किंवा चौकातून येणाऱ्या गाडीचा सिग्नल आधीच मिळेल

थांबलेली वाहने : जर रस्त्यावर पुढे एखादे वाहन खराब होऊन उभे असेल, तर दूरूनच त्याचा अलर्ट चालकाला मिळेल.५ ते ७ हजार रुपयांपर्यंत महाग होऊ शकतात गाड्यासरकार या संपूर्ण कार्यक्रमावर सुमारे ५,००० कोटी रुपये खर्च करू शकते. तथापि, वाहनांमध्ये बसवल्या जाणाऱ्या ऑन-बोर्ड युनिटची किंमत ५,००० ते ७,००० रुपयांच्या दरम्यान असण्याचा अंदाज आहे.

# स्वातंत्र्यसैनिक, घटनातज्ज्ञ नाथ पै



## निमित्त

नाथ बापू पै हे स्वातंत्र्य सैनिक, संसदपटू आणि निष्णात घटनातज्ज्ञ होते. त्यांचा जन्म २५ सप्टेंबर १९२२ रोजी वेंगुर्ले येथे झाला. तेथेच प्राथमिक शिक्षण झाले. बेळगावच्या लिंगराज कॉलेजमधून अर्थशास्त्र घेऊन बी.ए. (१९४७), नंतर लंडनच्या लिंकन्स इनमधून बार अट लॉ (१९५५) केले. संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांवर त्यांनी लहानपणीच प्रभुत्व मिळविले व वक्तृत्वगुणाचाही परिपोष केला. विल्यम शेक्सपिअर, पर्सी शेली, जॉर्ज बायरन इत्यादींच्या साहित्याचे आणि विदग्ध संस्कृत वाङ्मयाचे परिशीलनही त्यांनी केले होते. महाविद्यालयात असतानाच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. तत्कालीन भूमिगत चळवळींमध्ये त्यांचा मोठा वाटा होता. टपाल-कचेर्या लुटणे, पोलीस-कचेर्यांवर हल्ला करणे इत्यादी कारणांसाठी त्यांच्यावर त्यावेळी खटले भरण्यात आले. तुरुंगातील बेदम मारामुळे त्यांच्या हृदयावर विपरीत परिणाम झाला. १९४६ च्या प्राथमिक शिक्षकांच्या संपात, तसेच गोवामुक्ती आंदोलनात ते सहभागी झाले. १९४७ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथील इंटरनॅशनल युनियन ऑफ सोशॅलिस्ट यूथचे ते सहा वर्षे अध्यक्ष होते.

भारतात त्यांनी गोवा मुक्ती, संयुक्त महाराष्ट्र व बेळगाव सीमाप्रश्न ह्या विषयांवर लक्ष केंद्रित केले. इसवी सन १९५७ साली ते लोकसभा निवडणुकीत मोरोपंत जोशी ह्यांचा पराभव करून रत्नागिरी मतदारसंघातून (तत्कालीनराजापूर) खासदार म्हणून निवडून आले.त्यांनी केंद्रीय सरकारी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष असताना कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता वाढवून घेतला. कोकण रेल्वे हे नाथ पै ह्यांचे स्वप्न त्यांच्या हयातीत पूर्ण झाले नाही. ते स्वप्न मधु दंडवते व जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी ते केंद्रीय सत्तेत असताना पूर्ण केले. नाथ पै उत्कृष्ट संसदपटू होते आणि त्यांनी मॉस्को येथे जागतिक पार्लमेंटरी परिषद मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. इसवी सन १९६२ मध्ये ते पुन्हा खासदार म्हणून निवडून आले. त्यांनी पोर्तुगीज करीत असलेल्या गोवा येथील दडपशाहीबद्दल केंद्र सरकारला नियमितपणे माहिती दिली.इसवी सन १९६७ मध्ये ते पुन्हा खासदार म्हणून निवडून आले. राज्यघटनेत असलेले ३५९ कलम हे लोकशाहीची दडपशाही असल्याने ते रद्द करण्यासाठी त्यांनी सुचवले होते.

ज्ञानसंपन्नत्ता व अखंड व्यासंगीवृत्ती तसेच गरिबांविषयीची कळकळ, हे त्यांचे स्थायीभाव होते. बेळगावच्या प्रश्नावर त्यांनी सतत लढा दिला. साराबंदी चळवळीत प्रामुख्याने भाग घेतला (१९६०). त्याच वर्षीच्या सरकारी नोकरांच्या संपाचे ते प्रमुख होते. त्यात त्यांना अटक झाली. लोकसभेत त्यांचा स्पष्टवक्तेपणा, निर्भयपणा व चिकित्सक अभ्यास हे गुण दिसून येत. सुसंस्कृत राजकारणी (जंटलमन पोलिटिशिअन) अशा शब्दांत पं. नेहरूंनी त्याचा गौरव केला आहे.

अशा या थोर घटनातज्ज्ञाचे १८ जानेवारी १९७१ रोजी निधन झाले. पुणे शहरात राष्ट्र सेवा दलातर्फे साने गुरुजी स्मारक येथे नाथ पै यांच्या स्मरणार्थ 'बॅ. नाथ पै रंगमंच' नावाचे छोटे नाट्यगृह उभारले आहे. त्याचे उद्घाटन मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी २ एप्रिल २०१३ रोजी केले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# थंडीत भाज्या भाजून खाल्ल्याने होतो फायदा

पूर्वी माणूस कच्ची फळे, कंदमुळे खात होता, कालांतराने आगीचा शोध लागल्यावर माणूस अन्न भाजून, शिजवून खाऊ लागला. काही काळाने तेलाचा वापर वाढू लागला आणि या तळण्याच्या प्रक्रियेने आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण केल्या. म्हणूनच आता पुन्हा एकदा माणूस भाजून भाज्या, फळे खाण्यास प्राधान्य देत आहे. थंडीच्या दिवसांत विशेषतः टोमॅटो, बटाटा व पेरू या तीन गोष्टी भाजून खाल्ल्यास शरीराला बरेच लाभ होऊ शकतात. हे



फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी जर्नलच्या माहितीनुसार, तुम्ही थेट जेव्हा पदार्थ भाजून खाता तेव्हा त्यातील पोषक तत्वे अबाधित राहतात. अगदी शरीराला आवश्यक साखरेपासून ते फॅट्सपर्यंत सर्व काही. अन्न भाजताना त्यावर एक कॅरॅमल थर तयार होतो व कुरकुरीतपणा येतो यामुळे तुम्हाला अगदी तळल्यासारखीच चव मिळते आणि कच्चे खाण्याइतकीचे पोषणही लाभू शकते. हाडांच्या मजबुतीसह किडनी व पोटाचे आरोग्य सुदृढ राहावे म्हणून व्हिटॅमिन सी महत्त्वाचे असते. संत्री, अननस, गाजर यांच्यात व्हिटॅमिन सी मुबलक असते. हे पदार्थ भाजून खाताना हे सत्व अबाधित राहते

टोमॅटो भाजून खाल्ल्याचे फायदे : जेव्हा तुम्ही टोमॅटो भाजून खाता तेव्हा त्यातील अँटी ऑक्सिडंट्स सक्रिय होतात व त्याचा शरीराला अधिक लाभ होऊ शकतो. टोमॅटोमधील लाइकोपीन हे सत्व शरीराला पूर्णतः मिळू शकते. वजन कमी करण्यासाठी भाजलेल्या टोमॅटोचे सेवन फायदेशीर मानले जाते.

बटाटा भाजून खाल्ल्याचे फायदे : फूड अँड केमिस्ट्री जर्नलच्या माहितीनुसार, बटाटा जेव्हा भाजून खाल्ला जातो तेव्हा त्यातील फायबर ॲक्टिव्ह होते व पचनप्रक्रिया अधिक वेगाने होते. बटाट्यात असणारा व्हिटॅमिन बी ६ हा भाजल्याने ॲक्टिव्ह होऊन मेटाबॉलिज्म प्रक्रिया सुरळीत होते. जेव्हा तुम्ही बटाटा तळून खाता तेव्हा त्यात बॅड कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढू शकते. याविरुद्ध जेव्हा तुम्ही बटाटा भाजून खाता तेव्हा हृदय विकारांचा धोका कमी होऊ शकतो.

पेरू भाजून खाल्ल्याचे फायदे : फूड केमिस्ट्री जर्नलच्या माहितीनुसार, सुक्या खोकल्यावर भाजलेला पेरू उत्तम ठरतो. पेरूतील व्हिटॅमिन सी शरीरातील कफ दूर करण्यास मदत करतो. यामुळे क्षमतासुद्धा वाढू शकते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी वाहनांची पार्किंग

## पोलीस कर्मचारी भोजनासाठी गेल्यावर बिनदिक्कत चालतो खेळ

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगची समस्या अत्यंत गंभीर आहे. हॉटेल द लैंटर्न समोर पोलीस कर्मचारी बॅरिगेट्स लावून उभा असल्यानंतरच पर्यटक गाड्या तात्पुरत्या स्वरूपात तयार केलेल्या मैदानामध्ये पार्किंगसाठी उभ्या करतात. अन्यथा प्रत्येक पर्यटक गाडी समुद्रकिनाऱ्याच्या जवळ घेऊन येण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील सर्व रस्ते कायमच जाम होऊन जातात.

दुपारी त्या ठिकाणी कर्तव्यावर असणारा पोलीस कर्मचारी भोजनासाठी गेल्यानंतर सर्व पर्यटकांनी आपल्या गाड्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याजवळच आणून उभ्या करतात. त्यामुळे सदरचा रस्ता हा जाम झालेला पाहायला मिळतो. त्यामुळे समुद्रकिनारी असलेले रिसॉर्ट मालक कस्टमर येत नसल्यामुळे अनेक वेळा नुकसान सहन करत आहेत.

श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभीकरण केलेला असा धूप प्रतिबंधक बंधारा



बांधलेला आहे. या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या दक्षिण दिशेला म्हणजेच दांड्याकडच्या बाजूला एक हेलिपॅड देखील बांधलेले आहे. सदर हेलीपॅड पासून खेकडा असलेल्या पुतळ्यापर्यंत मोकळी जागा असून त्या ठिकाणी स्वच्छता केल्यास पे अँड पार्क तयार करता येऊ शकते. परंतु अनेक वेळा याबाबत लोकप्रतिनिधींजवळ बोलणे करून सुद्धा लोकप्रतिनिधींकडून याप्रकरणी दुर्लक्ष करण्याचे धोरण अवलंबल्याचे पाहायला मिळते. हेलिपॅड पासून जर का खेकड्याच्या पुतळ्यापर्यंत पार्किंग साठी जागा उपलब्ध केली. तर ती जागा वनखात्याची असली तरीही नगरपालिका त्या ठिकाणचा मेंटेनन्स करेल. त्यापासून नगरपालिकेला व वनखात्याला उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.

याचप्रमाणे फेस्टिवल बीचच्या बाजूला देखील पार्किंगची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्या ठिकाणी सतत गाड्या वेड्यावाकड्या उभ्या केल्यामुळे वाहतूक कोंडी नेहमीच झालेली पाहायला मिळते. समुद्रकिनाऱ्यावरील पार्किंगच्या बाबतीत श्रीवर्धन नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची पावले उचलली जात नाहीत. शुक्रवार, शनिवार, रविवार पर्यटकांची गर्दी श्रीवर्धन मध्ये खूप मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी पार्किंगची समस्या खूप मोठ्या प्रमाणावर उदभावते. या महिन्याच्या २४, २५, २६ तारखेला लागून सुट्ट्या असल्यामुळे संपूर्ण श्रीवर्धन तालुका पर्यटकांनी भरून जाणार आहे. या तारखांच्या अगोदर श्रीवर्धन नगर परिषदेने पार्किंगची सुविधा उपलब्ध करावी अशी मागणी या ठिकाणच्या नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

# कत्तलखान्यात नेणाऱ्या गाईंची महाड एमआयडीसी पोलिसांकडून सुटका

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वरंध या गावातील आरोपीने चार गाईंना दाटीवाटीने अमानुषपणे पिकप मध्ये मधून कत्तल खाण्यासाठी वाहतूक करीत असताना या गाईंची महाड एमआयडीसी पोलिसांनी सुटका केली असून यामध्ये पोलिसांनी गाडी जप्त करूनआरोपींना अटक केले आहे.

महाड एमआयडीसी पोलीस यांनी दिलेल्या माहितीनुसार आज सकाळी सहा वाजताच्या सुमारास मौजे नांगलवाडी गावचे हद्दीमध्ये मुंबई गोवा महामार्गावर एका पिकप मधून चार गाईंची दाटीवाटीने अमानुष पुणे



बेकादेशीर रित्या वाहतूक केली जात असताना पोलिसांनी सदर पिकप थांबवुन यातील चार गाईंची सुटका केली यावेळी. . दरम्यान पोलिसांनी दहा लाख किमतीच्या या पिकप सह दोन लाख किमतीच्या पशुंसह मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी आरोपी असलम अब्दुल पेवेकर वय ५० राहणार वरंध तालुका महाड, संतोष गंगाराम तांबे वय ३१ राहणार किये बौद्धवाडी व एक गोरेगाव येथील अज्ञात व्यक्ती अशा तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### कर्जतच्या उपगराध्यक्षपदी संतोष पाटील बिनविरोध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेच्या उपगराध्यक्षपदाची निवडणूक आज पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेस - उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आदी पक्षांची परिवर्तन विकास आघाडीची सत्ता नगरपरिषदेत आहे. परिवर्तन विकास आघाडीतील उद्धव सेनेचे संतोष सुरेश पाटील यांची उपगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या अध्यक्षतेखाली उपगराध्यक्ष पदाची निवडणूक पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ, शिंदे सेनेचे सात, उद्धव सेनेचे चार, भारतीय जनता पक्ष एक आणि अपक्ष एक असे नगरसेवक निवडून आले आहेत. परिवर्तन आघाडीचे तेरा तर महायुतीचे आठ असे पक्षीय बलाबल आहे. उपगराध्यक्ष पदासाठी संतोष पाटील यांचा एकमेव अर्ज असल्याने ते उपनगराध्यक्षपदी निवडून आल्याचे जाहीर केले.

## माणगाव येथे राष्ट्र सेविका रायगड समितीचे उद्या जिल्हास्तरीय सघोष पथसंचलन

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्र सेविका समिती, रायगड जिल्ह्याच्या वतीने भव्य व शिस्तबद्ध सघोष पथसंचलन रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी माणगाव येथे होणार आहे. सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील सेविकांचा मोठ्या संख्येने सहभाग राहणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पथसंचलनाचा प्रारंभ अशोक दादा साळवे विद्यालय, कचेरी रोड, माणगाव येथून होणार आहे. त्यानंतर डॉ. वैद्य हॉस्पिटल - साई मंदिर - निजामपूर रोड - मुख्य बाजारपेठ - कचेरी रोड असे मार्गक्रमण करून पुन्हा अशोक दादा साबळे विद्यालय येथे कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. कार्यक्रमाला शुभ संदेश स्मिताताई आंबेकर (प्रांत सह व्यवस्था प्रमुख) देणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रायगड जिल्हा सहकार्यवाहिका रुची काळे व माधवी कुवळेकर ,अरुंधती समिती शाखा माणगाव यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. राष्ट्रसेवा, शिस्त, संघटन आणि देशभक्तीचा जागर माणगाव नगरीत अनुभवायला मिळणार असून, सर्व नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून या प्रेरणादायी पथसंचलनाला साथ द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. याबाबत संपर्क साक्षी कामत ९६२३०५०२३० या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

# विज्ञान व हस्तकला प्रदर्शनातून सर्जनशीलतेसह वैज्ञानिक आविष्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

आजच्या वेगवान, तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगात शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेचा, निरीक्षणशक्तीचा आणि सर्जनशीलतेचा सर्वांगीण विकास घडवणे ही काळाची गरज बनली आहे. विज्ञान, कला आणि हस्तकला यांचा समन्वय साधत का?, कसे? आणि का नाही? असे प्रश्न विचारण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हे आधुनिक शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते. याच शैक्षणिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम





शाळेत यावर्षीही विज्ञान, कला, शिल्प आणि हस्तकला यांचे भव्य व देखणे वार्षिक प्रदर्शन भरविण्यात आले.

शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले असलेले हे प्रदर्शन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणारा आणि त्यांच्या प्रयोगशील विचारांचे सजीव दर्शन घडवणारा सर्जनशील उत्सवच ठरला. या प्रदर्शनाचे उद्घाटन अडानी सिमेंट कंपनीचे दिनकर सोनसूरकर आणि शुभम कामडी यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ, उद्योजक नितीन बामगुडे, शिपुरकर, स्नेह ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटनापासूनच शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि जिज्ञासेचे वातावरण अनुभवायला मिळाले. पालक, शिक्षक, विज्ञानप्रेमी, कला रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलात्मक व वैज्ञानिक प्रयोगांचा आस्वाद घेतला. लहानग्यांच्या हातून साकारलेल्या प्रयोगात्मक मॉडेल्स आणि कलाकृती पाहताना अनेक जण थक्क झाले, तर काही पालकांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तरळताना दिसून आले.

शाळेमध्ये संपूर्ण शैक्षणिक वर्षभर विविध वैज्ञानिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी निरीक्षण, संशोधन, विश्लेषण आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या आधारे तयार केलेल्या उत्कृष्ट कलाकृती आणि वैज्ञानिक मॉडेल्सचे एकत्रित सादरीकरण या प्रदर्शनात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना सहभागाची संधी देत, त्यांच्या विचारांना योग्य दिशा आणि व्यासपीठ देण्याचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशनतर्फे नेत्र कॉर्निया प्रशिक्षण

**मुरुड : प्रतिनिधी**

डोळे शरीरातील अतिशय महत्त्वाचे इंद्रिय आहेत.नेत्रदान हे श्रेष्ठ दान आहेच पण आपल्या विभागात जर कोणी नेत्रदान केल तर त्याबाबत यंत्रणा नसल्याने दान करणारेचे डोळे दान होत नाही.यांची दखल जंजिरा मेडिकल असोसिएशन घेऊन याबाबत नेत्र कॉर्निया काढण्याचे प्रशिक्षण शहरातील डॉ.मंगेश पाटील यांच्या हॉस्पीटल मध्ये सुरू केले.जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ संजय पाटील यांनी सांगितले की अनेक वर्षांपासून याचा पाठपुरावा करत होतो..एक नेत्रपेढी सोबत एमओयू करून आपले असोसिएशन त्यांच्यासोबत रजिस्ट्रेशन केले आहे असे डॉ.संजय पाटील यांनी सांगितले.यावेळी नेत्रदान केलेल्या व्यक्तींचे नेत्र काढणे नेत्र कॉर्निया काढण्याचे प्रशिक्षण दिले

# पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन

## ३५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आजपासून विशेष कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

जंजिऱ्याच्या सिद्दीवर वचक बसविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६७५च्या सुमारास पद्मदुर्ग किल्ल्याची उभारणी केली होती. जंजिरा किल्ला जिंकता यावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी पद्मदुर्ग किल्ल्याची उभारणी केली होती. पद्मदुर्गाला हिंदू कालगणनेनुसार यंदा ३५० वर्ष पूर्ण होत आहेत.

पद्मदुर्ग किल्ला उभारणीत रक्त सांडलेल्या ऐतिहासिक घराण्यांचे वंशज उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंहजी मोहिते त्याच बरोबर पद्मदुर्गाचे आरमार अधिकारी लायजी सरपाटील यांचे वंशज निलेशजी सरपाटील उपस्थित राहणार आहेत. त्याच बरोबर दुग्धशर्करा योग म्हणून इतिहास तपस्वी , आप्पा साहेब परब यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमात असणार आहे.

१९ जानेवारी १६७५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी पद्मदुर्गाच्या उभारणीचे पत्र प्रभावळीचे सुभेदार जिवाजी विनायक यांना लिहिले होते. याच पत्राचा संदर्भ पाहता हिंदू कालगणने नुसार यंदाचे वर्ष हे पद्मदुर्गाची मुहूर्त मेढ उभारणीचे ३५० वे वर्ष आहे. हीच मुहूर्त मेढ म्हणजे साक्षात मुरुडकरांची ग्रामदेवता श्री कोटेश्वरी मातेच्या स्थापनेला यंदा ३५० वर्ष होऊन ३५१ वे वर्ष सुरु होत आहे. हे सुवर्ण वर्ष अविस्मरणीय बनविण्यासाठी पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन साजरे करण्यात येणार आहे.

या सोहळ्यात विविध ऐतिहासिक कार्यक्रमांसोबत पद्मदुर्ग परिसरातील गडदुर्ग संवर्धन करणाऱ्या संस्थांचा

### ■ इतिहासकार देणार पद्मदुर्ग किल्ल्यास भेट



**कार्यक्रमांची रुपरेषा खालीलप्रमाणे**

**दिनांक १७ जानेवारी २०२६ :**

पद्मदुर्ग मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यशाळा (गाईड प्रशिक्षण)

संध्याकाळी ४.३० वाजता

- सत्र १ भारताचा वैभवशाली इतिहास, परकीय आक्रमण आणि शिवाजी महाराजांचा विजयी पराक्रम
- सत्र २ हिंदवी मराठा आरमार आणि कोकणची गौरवशाली परंपरा
- सत्र ३ पद्मदुर्गाचा इतिहास आणि विमर्ष. - सत्र ४ समारोप

**दिनांक १८ जानेवारी २०२६ :** पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन

- कोटेश्वरी देवीचे पूजन / मुहूर्तमेढीचे पूजन/ व - चित्रकला स्पर्धा
- गडदर्शन: गाईडसाठी गडाची, आतील वास्तूंची विस्तृत माहिती - श्री अनिकेत पाटील
- गाईडसाठी पर्यटकांची सुरक्षा, आणि समाज माध्यमांमध्ये व्यावसायिक रित्या जास्त लोकांपर्यंत पोचण्याविषयी मार्गदर्शन - अतुल मोरे
- दुर्गसंवर्धक आणि इतिहास विषयात मौल्यवान कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सत्कार
- सांस्कृतिक कार्यक्रम - शिवभूषण काव्यकथन - श्री पंकज विद्याधर भोसले

सत्कार करण्यात येणार आहे.पद्मदुर्गात दुर्गदर्शनासाठी मार्गदर्शकाची अभाव पाहता, पद्मदुर्ग जाणून घेण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मागणी पूर्ण करण्यासाठी विशेष पद्मदुर्ग मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमातून स्थानिकांना रोजगार उपलब्धी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर पद्मदुर्गाचा इतिहास सर्वदूर पसरविण्यास मदत होईल.

# श्रीवर्धनच्या रानवलीत स्वच्छतेचा उत्सव

## विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून केली प्लास्टिकबंदीबाबत जनजागृती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विशेष स्वच्छता अभियानाला श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायत रानवली यांनी कृतीतून प्रभावी प्रतिसाद दिला. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नेहा भोसले यांच्या आवाहनानुसार आज दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी रानवली गावात भव्य स्वच्छता मोहीम उत्स्फूर्त सहभागात पार पडली.

सकाळी ग्रामपंचायत कार्यालय परिसरातून मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी संपूर्ण गावाने एकत्र येत सार्वजनिक रस्ते, गटारे, मंदिर परिसर, चौक-कोपरे स्वच्छ करत स्वच्छ रानवली - सुंदर रानवली हा नारा प्रत्यक्षात उतरवला. गावातील प्रत्येक हात झाडूला लागल्याने ही मोहीम केवळ उपक्रम न राहता लोकचळवळ बनली.

या स्वच्छता मोहिमेचे विशेष आकर्षण ठरले ते स्थानिक शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'प्लास्टिक बंदी' विषयावरील पथनाट्य. विद्यार्थ्यांनी आपल्या सशक्त अभिनयातून प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, मानवी आरोग्यावरचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडले.प्लास्टिक हटाव - पृथ्वी वाचवा, आज नाही तर कधी, अशा घोषणांनी संपूर्ण गाव परिसर जागृत झाला.

मान्यवरांचे नेतृत्व, सर्वांचे श्रमदान या अभियानाचे नेतृत्व सरपंच सुरेश मांडवकर व उपसरपंच आत्ताउल्ला जळगावकर यांनी केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने, मुख्याध्यापक भिकू पांगारकर, तसेच राजू जाधव, विठोबा हावरे, भीमराव जोशी, भाविका जोशी, आयुब खान, ताजउद्दीन खान, रुकमुद्दीन सोगे यांनी प्रत्यक्ष झाडू हातात घेऊन श्रमदान केले.

स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृती यांचा सुंदर संगम असलेली ही मोहीम संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत असून रानवली ग्रामपंचायतीच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




**Shri. Chatrapati Shivaji High School And Loknete D.B. Patil Junior College**
Jasai, Tal. Uran, Dist. Raigad

**Notice Inviting E-Tender**

Rayat Shikshan Sanstha's Shri. Chatrapati Shivaji High School, Jasai, Tal. Uran, Dist. Raigad invites tenders for G+2 Storey building from reputed contractors. Sale of tenders from 15/01/2026 at 11.00 am till 27/01/2026 upto 01.00 pm on on https://edumart.sets.co.in/.Submission of E-tender till 27/01/2026 upto 03.00 pm.

| Name of work | Estimated Cost | Blank Tender Cost |
|---|---|---|
| Construction of G+ 2 R.C.C Building | Rs. 88,31,570 /- | Rs.5,000/- (non refundable) |

जा.क्र.: ५०/२०२५-२६
दिनांक : १६/०१/२०२६

**Sd/-**
**Head Mistress**
Shri. Chatrapati Shivaji High School
Jasai, Tal- Uran



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उसर्ली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १७ | ३ | ००-१७-८० पो.ख. ०-००-०० **एकूण ००-१७-८०** | २.६० | श्री. नरेश गोपीनाथ डांगरकर, श्री. श्याम गोपीनाथ डांगरकर, छबीबाई गोपीनाथ डांगरकर, अक्षय महादेव पाटील, अजय महादेव पाटील, सपना महादेव पाटील, चैताली महादेव पाटील. |

ठिकाण : पनवेल.
दिनांक : १५/०१/२०२६.

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारासमोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# कळंबोलीत रायगडचा राज्य क्रीडा दिन उत्साहात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलंपिक पदक विजेते म्हणून ज्यांचा संपूर्ण भारताला अभिमान आहे असे महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांनी ऑलंपिकमध्ये केलेल्या कामगिरीचा गौरव व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांचा जन्मदिन १५ जानेवारी, हा राज्य क्रीडा दिन म्हणून मुख्य समारंभ नवी मुंबई पोलीस मुख्यालय कळंबोली पनवेल येथील मैदानात तर रायगड मध्ये विविध ठिकाणी साजरा करण्यात आला.



या वेळी प्रमुख पाहुणे तीनवेळचे महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, उपायुक्त नवी मुंबई पोलीस मुख्यालय, शिवछत्रपती संजय कड्डू टेबल टेनिस, सुर्यकांत ठाकूर, कबड्डी, ऋषिकेश मालोरे वुशू, श्रेयस वैद्य वॉटरपोलो यांच्यासह राजाराम कुंभार खेलो इंडीयाचे मुख्य प्रशिक्षक, समीर रेवाळे, क्रीडा समन्वयक पनवेल महानगरपालिका, सोनार सर रायगड हॉकी संघटना व्यासपीठावर उपस्थित होते

विविध खेळातील ८० खेळाडूंचा ज्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पदक प्राप्त केले आहेत अशा खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. आजच्या सत्कार कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे खेळाडूंचा सत्कार हा माजी खेळाडू आणि ज्यांना राज्याचा सर्वोच्च असा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त आहे त्यांच्या हस्ते करण्यात आला.

जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रास्तावीकामध्ये शासनाच्या बदलत्या धोरणानुसार खेळाडूंना क्रीडा सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत, शासकीय नौकऱ्यांमधील आरक्षण, थेट नियुक्ती इ. केवळ क्रीडा स्पर्धांच्या अच्युत्त कामगिरीच्या बळावर सोप्या झाल्या आहेत. मिशन लक्ष्यवेध ह्या शासनाच्या महत्तवाकाक्षी योजनेचे स्वरुप पटवून दिले. संजय कडू यांनी क्रीडा स्पर्धांची सुरुवात मॅरेथॉन पासून कशी झाली आणि पुढे याचा विस्तार ऑलिंपिक किंवा जागतीक स्पर्धांपर्यंत कसा झाला याचे उत्तम उदाहरण दिले. महाराष्ट्र केसरी विजय चौधरी यांनी त्यांचे अनुभव सांगताना क्रिकेट खेळाची आवड असतांना वडीलांच्या प्रोत्साहनामुळे कुस्ती खेळात उतरुन अपार मेहनतीने महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त करता येऊ शकला. आई वडीलांचे मार्गदर्शन आणि पाठींबा असेल तर तुम्ही नक्कीच मोठे खेळाडू बनू शकाल. श्रेयस वैद्य आणि ऋषिकेश मालोरे यांनी सुध्दा शिवछत्रपती पुरस्कार मिळविण्यासाठी किती मेहनत, जिद्द आणि चिकाटी मनाशी असावी लागते यांचे अनुमय कथन केले.

निळकंठ आखाडे यांनी उत्कृष्ट सुत्रसंचलन करतांना आलेल्या खेळाडूंचे मनोगत व्यक्त करतांना त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी खेळाडूकडे खेळाबरोबरच प्रेक्षकांसमोर बोलण्याची क्षमता असणे गरजेचे आहे त्याने खेळण्यातला आत्मविश्वास वाढीबरोबरच सर्वसामान्य गोष्टींचे ज्ञान वाढणे गरजेचे असते. मनोगत व्यक्त करतांना ७ वर्षाची चिमुकली सारा जिने जलतरणात अवघ्या ७ व्या वर्षी खाडी पोहूण जाण्याचे अनेक विक्रम केले अनेक खेळाडूनी आपले मनोगत व्यक्त करतांना पालकाचे आणि उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ व त्यांचे सर्व सहकाऱ्यांचे विशेष आभार मानले संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन संपत्ती येळकर एनआयएस. कोच कुस्ती आणि त्यांचे प्रशिक्षणार्थी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे सुचिता ढमाले, संदीप गुरव, देविदास पाटील, अमोल शेळके, पोर्णीमा सकपाळ आणि केले. शेवटी आभार प्रदर्शनाने प्रशांत यांनी सर्वांची मने जिंकून कार्यक्रमाची सांगता केली.

# नवी मुंबई विमानतळावरून एक लाख प्रवाशांचा टप्पा पार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने मोठा ऑपरेशनल टप्पा गाठला आहे, जेथे व्यावसायिक कार्यसंचालनांना सुरूवात केल्याच्या पहिल्या १९ दिवसांमध्ये एक लाख प्रवाशांचा टप्पा पार केला आहे. यामधून प्रवाशांची मोठी पसंती आणि प्रवास मागणीमधील स्थिर वाढ दिसून येते.



१२ जानेवारी २०२६ पर्यंत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने एकूण १,०९,९१७ प्रवाशांची हाताळणी केली, ज्यामध्ये ५५,९३४ प्रवाशांनी आगमन केले, तर ५३,९८३ प्रवाशांनी प्रस्थान केले. एअरपोर्टने १० जानेवारी २०२६ रोजी सर्वाधिक व्यस्त दिवसाची नोंद केली, जेथे एका दिवसामध्ये ७,३४५ प्रवाशांची हाताळणी करण्यात आली.

या कालावधीदरम्यान एनएमआयएने ७३४ एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्सचे (एटीएम) व्यवस्थापन केले, ज्यामध्ये ३२ जनरल एव्हिएशन एटीएमचा समावेश होता. यामधून नियोजित व जनरल एव्हिएशन ऑपरेशन्समध्ये वाढता वापर दिसून येतो. एकूण ४०,२६० आगमन बॅग्ज आणि ३८,७७४ प्रस्थान बॅग्ज प्रोसेस करण्यात आल्या, यामधून सामानाची कार्यक्षमपणे हाताळणी करण्याची क्षमता दिसून येते, ज्यामागे प्रवाशांना अधिक कॅम्फर्ट देण्याचा मनसुबा आहे.

मालवाहतूकीसंदर्भात एनएमआयएने २२.२१ टन कार्गोची हाताळणी केली, यामधून विमानतळाचा सुरूवातीपासून प्रवासी व मालवाहतूक कार्यसंचालनांप्रती एकीकृत दृष्टिकोन दिसून येतो. कनेक्टीव्हीटीसंदर्भात दिल्ली, गोवा व बेंगळुरू प्रमुख क्षेत्रे ठरली.

सुरक्षितता, सेवा दर्जा आणि प्रवाशांना उत्साहवर्धक प्रवास अनुभव देण्याचे उच्च मानक राखत आहे.

# सीआयएसएफच्या जेएनपीए, शेवा युनिट येथे मिलेट्स मेळा; मान्यवरांची उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

संवरक्षिका अंतर्गत सीआयएसएफ युनिट जेएनपीए, शेवा येथे मिलेट्स मेळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश पौष्टिक व आरोग्यदायी आहाराबाबत जनजागृती करणे हा होता.



या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, आयएएस यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी श्री नायडू भास्कर एस. कमांडंट, सीआयएसएफ युनिट जेएनपीए शेवा, श्री गिरीश थॉमस, सीजीएम (ट्रॅफिक) जेएनपीए, बउआ झा, उप कमांडंट सीआयएसएफ युनिट जेएनपीए शेवा तसेच ताशी राबदेन भूटिया, सहायक कमांडंट सीआयएसएफ युनिट जेएनपीए शेवा उपस्थित होते.

आपल्या भाषणात अध्यक्ष गौरव दयाल, आयएएस यांनी मिलेट्सचे महत्त्व स्पष्ट केले तसेच संवरक्षिका सदस्यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. भविष्यातही अशा प्रकारचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यावर त्यांनी भर दिला.

संवरक्षिका सदस्यांनी मिलेट्स आधारित विविध पदार्थांचे प्रदर्शन केले. संवरक्षिका सदस्यांच्या मुलांनी व कुटुंबीयांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचा समारोप सहायक कमांडंट ताशी राबदेन भूटिया यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

# नवी मुंबई पालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का घसरला

## ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ – २६ करीता १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वा. पासून मतदानास प्रारंभ झाला. नवी मुंबईत १९१ ठिकाणी असलेल्या ११४८ मतदान केंद्रांवर नागरिकांचा उत्साही प्रतिसाद दिसून आला. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी बेलापूर ते दिघा अशा आठही विभागांतील मतदान केंद्रांना भेटी देऊन, प्रत्यक्ष पाहणी करून मतदान प्रक्रियेवर बारीक नजर ठेवली.

मतदान केंद्रावर आवश्यकतेनुसार अधिकच्या सुविधा पुरविण्याबाबत त्यांनी केलेल्या सूचनांची त्वरित अंमलबजावणी करण्यात आली. आयुक्तांनी रायन इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ या मतदान केंद्रावर सपत्निक जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत ८.१८ %, सकाळी ११.३० वा. पर्यंत १९.६८ %, दुपारी १.३० वा. पर्यंत ३३.२६ % आणि दुपारी ३.३० वा. पर्यंत ४५.५१ % इतके मतदान झाले होते. यापूर्वी झालेल्या सन २०१५ मधील निवडणूकीत एकूण ४८.३५% या तुलनेत यावेळी मतदारांचा अधिक उत्तम प्रतिसाद मतदानासाठी लाभलेला दिसला.



यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक प्रथमत:च बहुसदस्यीय पॅनल पध्दतीने होत असल्याने व त्यामध्ये एका मतदारास ४ मते दयावयाची असल्याने त्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन एका मतदान केंद्रावर ८०० ते ८५० मतदार असतील अशाप्रकारे मतदान यादीचे भाग करण्यात आले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी एका मतदारास एकच मत दयावयाचे असल्याने एका मतदान केंद्रावर १००० ते ११०० मतदार संख्या ठेवण्यात आली होती. ती यावेळी महानगरपालिका निवडणूकीत बहुसदस्यीय मतदान असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर ८०० ते ८५० इतकी कमी करण्यात आली होती. त्यामुळे विधानसभेच्या वेळी ज्या मतदान केंद्रावर मतदान केले होते त्यापेक्षा यावेळी अनेक मतदारांचे नाव वेगळया मतदान केंद्रावर होते.

१८० ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात मंडपातील मतदान केंद्रावरही चांगली व्यवस्था करण्यात आली होती. तसेच मैदान वा पटांगण शेजारी असलेल्या केंद्रांबाहेर नागरिकांना सावलीसाठी मंडप टाकण्यात आले होते. केंद्रांच्या ठिकाणी बैठक व्यवस्था, पिण्याची पाणी व्यवस्था, प्रसाधनगृहे व्यवस्था, वैद्यकिय पथक, इमर्जन्सी मेडिसीन किट, व्हिलचेअर अशा सुविधा पुरविण्यात आलेल्या होत्या.

# कै. तुकाराम घरत यांच्या पुण्यतिथीनिमित्त जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट

**उरण : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र घरत यांचे वडील दिवंगत तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी बुधवारी करण्यात आली.




वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त महेंद्रशेठ घरत यांनी जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट देऊन आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम उलवे नोड मधील 'भूमिपुत्र भवन'मध्ये झाला.

या वेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, महेंद्रशेठ यांनी आपल्या वडिलांचा वारसा उत्तमरित्या चालविला आहे. दिवंगत ज. आ. भगत यांची प्रेरणा घेऊन तो सर्वच क्षेत्रांत धडाडीने काम करतोय. वडिलांच्या नावे ज्युनियर महाविद्यालय, तर आईच्या नावाने यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था सुरू करून गोरगरिबांसाठी शैक्षणिक कार्य त्याने जोमाने सुरू ठेवले आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्ही निवडणुकीपुरते राजकारण करतो, बाकी आमच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी आम्ही घेतो.

या वेळी 'पैशाने तुटली नाती' हे नाटक सादर करण्यात आले. आगरी बोली भाषेतील हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. खचाखच भरलेल्या 'भूमिपुत्र भवन'मध्ये रसिकांच्या टाळ्यांनी कलाकारांची मने जिंकली. भूमिपुत्र भवनमध्ये 'पैशाने तुटली नाती' हे पहिल्यांदाच नाटक सादर करण्यात आले. त्यामुळे कलाकार, रसिक यांच्या प्रेमाला भरते आले होते.

दिवंगत तुकाराम नारायण घरत यांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, उरण नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, महेंद्रशेठ यांचे सासरेबुवा रामशेठ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील आदी शेकडो मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या गव्हाण येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि खारकोपर येथील दिवंगत तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्येही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

तुकाराम नारायण घरत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरुंगातही जावे लागले, परंतु ते मागे हटले नाहीत. त्यांनी त्याकाळी शैक्षणिक, सामाजिक चळवळ राबवली.

# कळंबोलीत पिता-पुत्राचा पराभव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक आठमधील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सतीश मोहन पाटील आणि तुषार सतीश पाटील या पिता-पुत्राचा पराभव झाला आहे.

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी पार पडली तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी भाजप -शिंदे सेनेने पनवेल महानगरपालिकेवर सत्ता प्रस्थापित केली. या निवडणुकीत प्रभाग क्रमांक आठ कळंबोली येथून राष्ट्रवादी शरद पवार पक्षातर्फे पिता पुत्र रिंगणात उतरले होते. त्यामुळे याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते.

सतीश पाटील यांच्याविरोधात भाजपचे बबन मुकादम तर तुषार सतीश पाटील यांच्या विरोधात शिंदे सेनेचे रामदास शेवाळे निवडणूक लढवत होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत सतीश पाटील आणि तुषार पाटील या पिता पुत्राचा पराभव झाला.

# डायलिसिस रुग्णांसाठी वार्षिक सहल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बिरमोळे हॉस्पिटलतर्फे डायलिसिसच्या रुग्णांसाठी वार्षिक सहल वरसोली-अलिबाग येथे आयोजित करण्यात आली.



सहलीमध्ये डायलिसिसचे रुग्ण, त्यांचे काळजीवाहू नातेवाईक व डायलिसिस विभागाचे कर्मचारी यांनी भाग घेतला. समुद्रकिनारी भटकंती, किनारा घोडा-गाडीमधून फेरफटका व नारळी पोफळीच्या बागेत जेवणाचा आनंद लुटला. या सहलीमुळे रुग्णांमध्ये सकारात्मकता वाढवून नवी उमेद आल्याचे जाणवले.

या सहलीच्या आयोजनासाठी डॉ.बी.जे.बिरमोळे ,डॉ.नीलम नलावडे यांचे मार्गदर्शन लाभले. सहलीच्या यशस्वितेसाठी बिरमोळे हॉस्पिटलमधील एच. आर.रश्मी पोतनीस व डायलिसिसचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आवरे विद्यालयात कृतज्ञता सोहळा



**उरण : वार्ताहर**

हिंदू संस्कृतीमध्ये आई-वडील ,अतिथी आणि शिक्षक यांच्या ऋणामध्ये प्रत्येक जण असतो. त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या अनुषंगाने माजी मुख्याध्यापक मनोहर पाटील, एन आर पाटील, शरद केणी, कौशिक ठाकूर, प्रमोद घरत, अविनाश म्हात्रे, शोभा ढाके, संगीता ठाकूर, शकुंतला नारंगीकर, नरेश म्हात्रे, सुभाष ठाकूर, निवास गावंड,शेखर म्हात्रे, वायकोले, प्रकाश म्हात्रे तसेच शिक्षकेतर कर्मचारी कल्पना म्हात्रे, सदानंद म्हात्रे या गुरुवर्यांच्या तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत हा कृतज्ञता सोहळा दिमाखात साजरा करण्यात आला.

काही तांत्रिक कारणामुळे उपस्थित न राहिलेल्या सुरेश भेंडे, संतोष म्हात्रे, हरेश पाटील, गोपीनाथ ठाकूर या अध्यापकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या वेळी शिक्षक मित्र, प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे, भरत जाधव, रा.का गावंड तसेच दिवंगत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रवेशद्वाराजवळ माजी शिक्षकांनी प्रवेश केल्यानंतर त्यांना विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन नतमस्तक होऊन आदरपूर्वक स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धरीत्या कमान बनवून फुलांची उधळण करत सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या वेळी गुरु शिष्य संवाद झाला. निनाद म्हात्रे यांनी सुंदर रंगछटांच्या रांगोळ्या काढल्या होत्या. तर महेश गावंड व सुगंधा म्हात्रे या विद्यार्थ्यांनी इशस्तवन गुरुवंदना गीत गायले.

रेशमा म्हात्रे हिने सूत्रसंचालन केले. सुरेंद्र म्हात्रे, विक्रांत वर्तक, ज्योत्स्ना गावंड, सुशील ठाकूर तसेच अन्य विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सीबीडीत तीळगूळ घ्या आणि वाहतूक नियमांचे पालन करा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सीबीडी परिसरात मकर संक्रांतीच्या निमित्ताने तिळगुळ घ्या आणि वाहतूक नियमांचे पालन करा असा संदेश देणारा अनोखा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम विनय मोटर ट्रेनिंग स्कूल यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमास सीबीडी वाहतूक पोलीस निरीक्षक लोखंडे सर यांच्यासह वाहतूक विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपक्रमाचे संपूर्ण आयोजन विनय मोटर ट्रेनिंग स्कूल यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सहभागी स्वयंसेवकांनी हातात जनजागृतीचे फलक घेऊन नागरिकांना तिळगुळ वाटप केले व आपण सुरक्षित रहा, इतरांनाही सुरक्षित ठेवा, वाहतूक नियमांचे पालन करा असे संदेश दिले.

नागरिकांशी थेट संवाद साधत नियमांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या उपक्रमात टीमचे प्रतिनिधित्व साई विनय मोरे यांनी केले. त्यांच्यासोबत सचिन, शाम, विशाल, ओम मोरे, आनंद जहा तसेच सारथी सुरक्षा सेवा संस्थाचे इतर पदाधिकारी सक्रियपणे सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे, या जनजागृती उपक्रमासाठी इनरव्हील क्लब वाई यांच्या अध्यक्षा रूपाली मोरे यांनी मोलाचे सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी जपत रस्ता सुरक्षेसाठी त्यांनी दिलेले योगदान उपस्थितांकडून विशेष कौतुकास पात्र ठरले. 'मिशन सुखरूप' अंतर्गत देशभरात सुरू असलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह जनजागृती २०२६च्या निमित्ताने हा उपक्रम वेगळ्या व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्यात आला. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, सुरक्षित वाहतुकीबाबत सकारात्मक संदेश सर्वदूर पोहचल्याचे आयोजकांनी नमूद केले.

# श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयाची शववाहिनी सात महिने चालकाविना

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे स्थानिक नागरिक नाराज

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत श्रीवर्धन तालुक्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली शववाहिनी गेल्या सात महिन्यांपासून चालकाविना असून, ही बाब प्रशासनाच्या गंभीर निष्काळजीपणाचे उदाहरण ठरत आहे. गुरुवार, दिनांक २६ जून रोजी श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयात ही शववाहिनी दाखल झाली होती, मात्र आजतागायत या अत्यावश्यक सेवेकरिता स्वतंत्र चालकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

शववाहिनी उपलब्ध झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात अनेक दिवस हे वाहन चालकाविना रुग्णालयाच्या परिसरात निष्क्रिय अवस्थेत उभे होते. परिणामी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांना मृतदेह स्मशानभूमीपर्यंत किंवा रुग्णालयातून घरी नेण्यासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. शासनाने अत्यल्प दरात उपलब्ध करून दिलेल्या शववाहिनी सेवेचा लाभ मिळावा, यासाठी नातेवाईकांकडून मागणी वाढल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात रुग्णवाहिकेचा चालक शववाहिनी चालविण्यासाठी वापरण्यात येऊ लागला.



ही व्यवस्था पूर्णतः अयोग्य व धोकादायक ठरत आहे. श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात सध्या १०२ क्रमांकाच्या दोन रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. काही महिन्यांपूर्वी कंत्राटी चालकांची मुदत संपल्याने या दोन्ही रुग्णवाहिकांची जबाबदारी सध्या केवळ एका चालकावर आहे. तालुक्यातील दुर्गम खेडेगावातून रुग्ण आणणे, तातडीच्या उपचारासाठी शहरात हलविणे आणि त्याच वेळी शववाहिनी सेवा देणे, हे सर्व काम एकाच चालकाकडून करून घेतले जात आहे. ही बाब वैद्यकीय सेवा नियमावली, कामगार कायदे तसेच मानवी संवेदनांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

शववाहिनी सेवेसाठी मृत व्यक्तीचे नातलग अंत्यसंस्काराची वेळ ठरवून रुग्णालयात नोंदणी करतात. मात्र अनेकदा रुग्णवाहिकेवरील एकमेव चालक रुग्णाला पुढील उपचारासाठी बाहेरगावी नेलेला असल्यामुळे नियोजित वेळेत शववाहिनी उपलब्ध होत नाही. यामुळे शोकाकुल कुटुंबीयांना मानसिक तणाव, विलंब आणि अपमानास्पद परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांनी शववाहिनीकरिता तातडीने स्वतंत्र चालकाची नियुक्ती करावी, रुग्णवाहिका व शववाहिनी सेवांची स्वतंत्र यंत्रणा उभी करावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण घ्यावे, अशी ठोस मागणी केली आहे. अन्यथा ही बाब मानवी हक्कांचे उल्लंघन ठरत असून, संबंधित प्रकरणाची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

> **सद्यस्थितीत शववाहिनी सेवेसाठी स्वतंत्र चालक उपलब्ध नसल्यास, उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णवाहिकेवरील चालकाची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच शववाहिनीसाठी कायमस्वरूपी चालक नियुक्तीबाबत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाशी आवश्यक पत्रव्यवहार सुरू असून, याबाबत लवकरच सकारात्मक व ठोस कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.**
> **-कौस्तुभ दिलीप केळस्कर,**
> प्रभारी वैद्यकीय अधीक्षक,
> श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय

# मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी विरेंद्र भगत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद उपनगराध्यक्ष पदाकरीता शिवसेना शिंदे पक्षांकडून विरेंद्र दत्तात्रेय भगत यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर यांनी विरेंद्र दत्तात्रेय भगत यांना उपनगराध्यक्ष पदी बिनविरोध निवडून आल्याचे घोषित केले.

स्वीकृत नगरसेवक पदा करिता अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून मनोज हरिश्चंद्र भगत तर शिवसेना पक्षांकडून ॲड.रूपेश शंकर पाटील यांनी आपले उमेदवारी अर्ज काल दाखल केले होते. आज दोन्ही नगरसेवक निवडून आल्याचे पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी घोषित केले. या वेळी मुख्याधिकारी सचिन बच्छाव उपस्थित होते.



य वेळी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांना पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा आराधना दांडेकर व मुख्याधिकारी -सचिन बच्छाव यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तद्नंतर उपनगराध्यक्ष दालनात येऊन विरेंद्र भगत यांनी पदग्रहण केले.

शिवसेना शिंदे पक्षाकडून उपनगराध्यक्ष पदासाठी विरेंद्र दत्तात्रेय भगत यांनी नगरपरिषद कार्यालयातील राजे शिवछत्रपती महाराजांना पुष्पहार अर्पण करून जय भवानी जय शिवाजी हर हर महादेव घोषणा देत आपल्या नवनिर्वाचित नगरसेवकांसह उपनगराध्यक्ष पदा करिता उमेदवारी अर्ज प्रशासकीय अधिकारी-नंदकुमार आंबेतकर यांच्याकडे दाखल करण्यात आला. महाविकास आघाडीकडे संख्या बळ नसल्याने त्यांनीच आधीच उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणूकी पासुन माघार घेतली होती.

या वेळी शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, महिला जिल्हा प्रमुख -तृप्ती पाटील, शहर प्रमुख -संदिप पाटील, माजी नगराध्यक्ष - स्नेहा पाटील, हर्षला विरेंद्र भगत, श्रीकांत सुर्वे, नगरपरिषदेचे गटनेते पांडुरंग आरेकर, नवनिर्वाचित नगरसेवक मनिष विरकुड, रुपेश रणदिवे, नितिन आबुर्ले, विजय पाटील, नगमाना खानजादे, अंकिता गुरव, सुगंधा मकु, श्रीकांत खोत, यास्मिन कादिरी, प्रिती चौलकर, आदेश दांडेकर, रुपेश पाटील, श्रध्दा अपराध, देवयानी गुरव, प्रमिला माळी, तमीम ढाकम, प्रांजली मकु आशिष दिवेकर, दिपेश वरणकर, युगा ठाकूर, गिरीश साळी, मेघाली पाटील, रहिम कबले, आदिंसह शेकडो शिंदे शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# रातवड विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर क्रिकेट संघटना, महाड यांच्या वतीने गुरुवारी (दि.१५) माध्यमिक विद्यामंदिर, रातवड विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात प्रोत्साहन देणे व त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे हा होता. कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते.

मुख्याध्यापक संतोष कदम यांनी संघटनेच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी या संधीचा योग्य उपयोग करून अभ्यासात सातत्य ठेवावे, असे आवाहन केले. शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

गेल्या वर्षीही या संघटनेच्या वतीने विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संघटनेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

# माणगावमध्ये मोतीबिंदू रुग्णांना गॉगलचे मोफत वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

समाजभान जपत आणि मानवतेचा आदर्श ठेवत संजना संतोष खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त माणगाव उपजिल्हा रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी ५० संरक्षणात्मक गॉगलचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुग्णालय प्रशासनाने या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना केवळ साहित्यिक मदतच नव्हे तर मानसिक बळही मिळते, असे गौरवोद्गार काढले. राज खाडे, जय खाडे व संपूर्ण खाडे परिवार यांच्या पुढाकारातून ही सेवा घडून आली.



# खोपोली उपनगराध्यक्षपदाचा पदभार विक्रम साबळेंनी स्वीकारला



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेचे महायुतीचे भारतीय जनता पक्षाचे उपनगराध्यक्षपदी निवड झालेले विक्रम यशवंत साबळे यांनी आपल्या दालनात पदाचा पदभार स्वीकारला. या वेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी त्यांना आसनावर स्थानापन्न केले व शुभेच्छा देताना शाल देऊन सत्कार केला.

या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व भाजपचे ज्येष्ठ नेते यशवंत साबळे, सर्व नवनिर्वाचित स्वीकृत सदस्य भाजपच्या अश्विनी अत्रे, शिवसेनेचे दिनेश थोरवे, यास नगरसेवक व महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच मान्यवर नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याचवेळी भारतीय जनता पक्षातर्फे त्यांचे अभिनंदन करताना शुभेच्छा दिला यात शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, युवा मोर्चाचे डॉक्टर निकेत पाटील, काशिनाथ पारठे महोशीनाश शेख, मोसिन शेख, विभावरी पाठक, अपर्णा साठे, नामदेव मोरे त्याचप्रमाणे महिला मोर्चाच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विक्रम साबळे यांना शुभेच्छा दिल्या.

# तटकरे महाविद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव (रायगड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत, त्यांच्या विचारांची समाजपरिवर्तनातील भूमिका अधोरेखित केली. तरुणाईला आत्मविश्वास, चारित्र्यनिर्मिती आणि राष्ट्रउभारणीचा संदेश देणारे विवेकानंदांचे विचार आजही तितकेच मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.



या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. खामकर यांनी हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या कार्यावरही सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांनी स्वामी विवेकानंदांनी केलेल्या वेदांत व योगाच्या प्रचार-प्रसारावर, तसेच रामकृष्ण मिशनच्या स्थापनेमागील समाजसेवा व आध्यात्मिक प्रबोधनाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मशक्तीची जाणीव या मूल्यांमुळेच राष्ट्र सक्षम बनते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या प्रेरणादायी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. नेहा गावडे तसेच महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा. वृषाली सालसकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषिरत्न शेखर भडसावळे यांना प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे निमंत्रण

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने देशातील २५० नामांकित व्यक्तींना राष्ट्रपती कार्यालयाने निमंत्रित केले आहे. ती २५० निमंत्रित यांच्यामध्ये कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. शेती क्षेत्रातील नामांकित व्यक्तीला असा बहुमान मिळत असल्याने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

राज्य सरकार कडून कृषी भूषण आणि कृषी रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले शेतकरी शेखर भडसावळे यांना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी राष्ट्रपती भवन येथे होणाऱ्या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. शेखर भडसावळे यांनी भाताच्या विविध जातींचे वाण शोधण्यात मोठे योगदान आहे. त्यानंतर त्यांनी पारंपारिक शेतीमध्ये बदल घडवून



आणण्यासाठी मशागत मुक्त शेती ही संकल्पना एसआरटीचे माध्यमातून विकसित केली आहे. तर कमी खर्च आणि मजुरांची संख्या कमी करण्यात एसआरटी तंत्रज्ञान शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत आहे.

अन्न निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान असलेले सगुणा रुरल फाउंडेशनच्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान शेखर भडसावळे यांचे राहिले आहे. शेतीबरोबर वणवे रोखण्यासाठी सगुणा वनसंवर्धन समिती तसेच सांडपाणी मुळे नदी नाले यांना जलपर्णी यांनी वेढले असून त्यावर मात करण्यासाठीदेखील सगुणा रुरल फाऊंडेशन कार्य करीत आहेत.

या सर्व कार्याची दखल घेत शेखर भडसावळे यांना देशाच्या राष्ट्रपती यांच्याकडून यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. देशातील २५० महनीय व्यक्तींना राष्ट्रपती भवनाकडून राष्ट्रपती भवन येथील प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.

शेखर भडसावळे यांना हे निमंत्रण नेरळ पोस्ट कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी यांनी सगुणा बाग येथे जाऊन दिले. शेतकरी वर्गासाठी हा आनंदाचा क्षण असून सगुणा बागमध्ये त्याबाबत जल्लोष साजरा होत आहे.

# रोहा येथे वक्तृत्व स्पर्धा; विविध विषयांवर मतप्रदर्शन

**धाटाव : प्रतिनिधी**

देशाचे केंद्रीय अर्थमंत्री व रोह्याचे सुपुत्र स्व. डॉ. सी. डी. तथा चिंतामणराव देशमुख यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त रोहा येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत युवकांनी विविध विषयांवर परखड मतप्रदर्शन केले. रोहा प्रेस क्लब व तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील राम मारुती चौक येथे ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. वरिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक भरत देवराम चौधरी रोहा, द्वितीय आदिती अनिल वाटवे सी.के.टी. कॉलेज, तृतीय सायली प्रज्वल बापट यांनी पटकावला, तर श्रवण वामन कदम कोलाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.



कनिष्ठ गटामध्ये प्रथम विश्व जनार्दन उभारे कोएसो मेहेंदळे, रोहा, द्वितीय तनिष्क सतेज आपणकर जे. एम. राठी स्कूल, तृतीय आस्था विनोद थिटे श्रमिक विद्यालय, चिल्हे तर अंतरा रूपेश शिंदे के.ई.एस., रोहा हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

या स्पर्धेचे तुळशीदास मोकल व अमित गुजर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धा प्रमुख म्हणून रोशन चाफेकर, नंदकुमार मरवडे, रविंद्र कान्हेकर, शशिकांत मोरे यांनी संयोजनाची धुरा सांभाळली. कार्यक्रमात नगराध्यक्षा वनश्री शेडगे, ज्येष्ठ गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, नगरसेविका स्नेहा अंबरे, स्पर्धा प्रमुख आणि नगरसेवक रोशन चाफेकर, रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेच्या आयोजनात सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान, मावळा प्रतिष्ठान, राजमुद्रा फाउंडेशन, रोट्रॅक्ट क्लब, अभिनव रोहा, रोटरी क्लब रोहा, श्रीकृपा फाउंडेशन, स्पंदन नाट्य संस्था, शिवचरण मित्रमंडळ, मॉर्निंग क्लब रोहा, शिवशंभु प्रतिष्ठान रोहा, रोहा युवा आदी संस्थांनी परिश्रम घेतले.

# मुरूडमध्ये उद्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भारत सरकार अंतर्गत क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित मेरा भारत आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यासाठी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ (खुला गट)चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

या स्पर्धेमध्ये १६ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी सांघिक तसेच वैयक्तिक स्वरूपात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. मुरूड तालुक्यातील युवा वर्गामध्ये क्रीडा संस्कृती व्हावी तसेच स्थानिक स्तरावर त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या दुहेरी उद्देशातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे यांनी सांगितले आहे.

स्पर्धेअंतर्गत सांघिक खेळामध्ये पुरुषांसाठी कबड्डी व महिलांसाठी खो-खो या खेळांचा समावेश आहे. तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारांतर्गत पुरुष व महिलांसाठी धावणे (४०० मी) आणि गोळाफेक या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी https://forms.gle/1wVXuG3qx4CZj3yX8 या लिंकवर आपली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धकांना प्रवेश निश्चितीसाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. सकाळी ८ ते १० मधील नोंदणीमध्ये प्रवेश नोंदविणे अनिवार्य असेल. तरी याबाबत अधिक माहिती व नोंदणीसाठी दर्श नागोटकर (७०५७५१८२६३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

# महायुतीचा जल्लोष

























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com